रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ११८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## झेनिथ धबधब्यात तरुणी गेली वाहून

**खोपोली :** परतीच्या पावसाचा आनंद घेण्यासाठी झेनिथ धबधबा येथे फिरण्यासाठी सख्खे बहिणी, भाऊ गेले होते. नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढल्यामुळे २२ वर्षांची स्वप्नाली वाहत गेली. तिचा मृतदेह खालची खोपोलीत पेप्पो कंपनीच्या पुलाखाली सापडला आहे. खोपोलीतील तरूणीचा मृत्यू झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

स्वप्नाली क्षिरसागर (२२) रा. कृष्णा व्हॅली सोसायटी, झेनिथ ठाकूरवाडीशेजारी राहात आहेत. भाऊ आणि तीन बहिणी झेनिध धबधब्यावर आनंद लुटण्यासाठी पान २ वर


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹












**आजचा अग्रलेख**

**एसटीची गाडी धावेल?**

### वे|ध|क

### मनोज जरांगेंचे आंदोलन स्थगित

**जालना :** मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी नऊ दिवस उपोषण केल्यानंतर बुधवारी उपोषण मागे घेतले. मराठा समाजाला होत असलेल्या त्रासामुळे आपण हा निर्णय घेत आहोत, असं जरांगे म्हणाले. यावेळी त्यांनी सरकारालाही इशारा दिला आहे. ते म्हणाले की, माझं उपोषण सुरु असताना समाज बांधवांना झालेला त्रास मला सहन होत नाहीये, न्यायालयाचा मी सन्मान करतो. उपोषण करुनही आता काही फायदा नाही. आता थेट लढाई लढणार.

### आज सुनावणी?

**नवी दिल्ली :** शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी गुरुवारी (दि. २६) सर्वोच्च न्यायालयात होण्याची शक्यती आहे. या आठवड्यात मंगळवारी, बुधवारी सलग दोन दिवस आणि त्यापूर्वीच्या दोन आठवड्यांमध्ये पाच दिवस हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या पटलावर होते. मात्र, अन्य प्रकरणांमुळे आमदार अपात्रता प्रकरण सुनावणीपर्यंत पोहोचू शकले नव्हते. त्यामुळे यावेळी तरी या प्रकरणावर सुनावणी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. मात्र, गुरूवारी सुनावणी न झाल्यास हे प्रकरण पुढच्या आठवड्यात जाण्याची शक्यता आहे.

# 'तिसरा डोळा' निधीहीन

**तिजोरी खाली, मुहूर्त हुकला**

- **२९०० शाळांपैकी अवघ्या ३०६ शाळांमध्ये सीसीटीव्ही**
- **शाळांची सुरक्षा वाऱ्यावर**
- **शासनाकडून निधी न मिळाल्याचा फटका**

प्रमोद जाधव

| अलिबाग |

बदलापूर येथील घटनेने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षे प्रश्न निर्माण झाला. यामुळे शाळा परिसर, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ज्या शाळांमध्ये सीसीटी कॅमेरे नाहीत, अशा शाळांमध्ये एक महिन्याच्या कॅमेरे लावण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु, एक महिन्याचा कालावधी संपत आला असताना रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग त्याची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यास अपयशी ठरल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे. जिल्ह्यातील दोन हजार ९०० शाळांपैकी फक्त ३०६ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. शासकीय शाळांमध्ये निधी नसल्याने कॅमेरे बसविण्यास आले असल्याची माहिती समोर येत आहे.




बदलापूर येथील दुर्घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे सरकारने शासन निर्णय जारी करीत एक महिन्याच्या आत शाळेच्या प्रमुख ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे बंधनकारक केले. सुरक्षाविषयक पान २ वर

> जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे मागील पंधरा दिवसांपूर्वी लेखी मागणी केली आहे. निधी उपलब्ध झाल्यावर तातडीने कॅमेरे बसविले जातील.
>
> – पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी, रायगड

> सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी जिल्हा परिषदेने मागणी केली आहे की नाही, याबाबत फाईल बघून सांगतो.
>
> – जयसिंग मेहेत्रे, नियोजन अधिकारी, रायगड

## रुग्णालयाचा स्लॅब कोसळला



**सुदैवाने मोठी जीवितहानी टळली**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

अलिबागमधील जिल्हासामान्य रुग्णालयातील तळ मजल्यावर असलेल्या स्वयंपाकगृहातील स्लॅब अचानक कोसळला. त्याठिकाणी काम करीत असलेल्या महिलांचा जीव सुदैवाने वाचला. त्या दोघीही सुखरूप आहेत. मात्र, जीव मुठीत घेऊन काम करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत ४० वर्षे जुनी आहे. या इमारतीचे दोन वर्षांपूर्वी स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. त्यामध्ये ही इमारत धोकादायक असून, पान २ वर

## जुन्या पेंशनसाठी शिक्षक आक्रमक

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

विद्यार्थी व शिक्षक यांच्यावरील संच मान्यता व कंत्राटी शिक्षक भरतीचा शासन निर्णय रद्द करणे, अशा अनेक मागण्यांसाठी जिल्ह्यातील शिक्षक एकवटले. 'एकच मिशन जुनी पेन्शन, शाळांमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करा' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून सोडला होता. शालेय धोरणाबाबत सरकारच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत रायगड जिल्ह्यातील शिक्षकांनी त्यांच्या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर बुधवारी (दि.२५) दुपारी मोर्चा काढला. हजारोंच्या संख्येने शिक्षक या मोर्चात सामील होऊन सरकारविरोधात घोषणाबाजी करीत होते.

सरकारने कंत्राटी पान २ वर

**जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा**



(छायाचित्र : समीर मालोदे)

**विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान**

रायगड जिल्ह्यातील चार हजारांहून अधिक शिक्षकांनी बुधवारी सामूहिक रजा आंदोलन पुकारले. नियमित शाळांमध्ये शिकविणारे शिक्षक उपस्थित नसल्याने शाळेतील विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय झाली. काही शाळा शिक्षक नसल्याने बंद राहिल्या. काही शाळांमध्ये शिक्षकच आले नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षकांची वाट पाहावी लागली. दिवसभर शाळेत शिक्षक नसल्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर मोठा परिणाम झाला. सरकारच्या नाकर्तेपणामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे चित्र दिसून आले.

## रेल्वेचे फाटक चार दिवस बंद



**| नेरळ | प्रतिनिधी |**

मध्य रेल्वेचे मेन लाईनवरील नेरळ येथे असलेले फाटक हे दुरुस्तीच्या कामासाठी २६ सप्टेंबरपासून ३० सप्टेंबर या कालावधीत बंद ठेवले जाणार आहे. परिणामी, नेरळ पूर्व आणि पश्‍चिम भागातील स्थानिक रहिवाशांचे हाल होणार आहेत. वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा, अशी सूचना मध्य रेल्वे आणि नेरळ ग्रामपंचायतीने केली आहे.

मध्य रेल्वे वर नेरळ हे जंक्शन स्थानक आहे. या स्थानकात मेन लाईनवरील ८६ किलोमीटर अंतर येथे मध्य रेल्वेचे फाटक क्रमांक २१ आहे. त्या ठिकाणी नेरळ पूर्व आणि पश्चिम भाग जोडणारा भाग असल्याने वाहनांच्या रांगा सतत लागलेल्या असतात. त्यामुळे या फाटकाचा पृष्ठभाग हा कायम नादुरुस्त होत असतो. पान २ वर

## सीईओंनी केली डीएचओची कानउघाडणी

- **बदल्यांच्या फायली दाबल्या**
- **कारवाईच्या बडग्याने डॉ. बाई आल्या वठणीवर**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी मनिषा विखे कायमच वादाच्या भोवऱ्यात सापडत असतात. कर्मचाऱ्यांच्या बदलीची फाईल थांबविण्याचा प्रताप त्यांनी केला होता. याबाबतची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांना मिळाली. त्यांनी मंगळवारी तडक विखे यांच्या केबिनमध्ये प्रवेश करुन सर्व फाईलींची झाडाझडती घेतली. त्यामध्ये तक्रारदाराने केलेली तक्रार खरी ठरली. डॉ. बास्टेवाड यांचा पारा चढला आणि त्यांनी विखेंवर निलंबनाच्या कारवाईचा बडगा उगारला. विखे यांनी गयावया केल्यानंतर डॉ. बास्टेवाड यांनी वॉर्निंग देत प्रकरणावर पडदा टाकला. मात्र, पुढे असे आढळून आल्यास कारवाई केली जाईल, अशी तंबी दिल्याची चर्चा जिल्हा परिषदेमध्ये सुरु आहे.

जिल्ह्यात गेल्या महिन्याभरापासून डेंग्यूचे रुग्ण वाढत आहेत. विशेष म्हणजे, ग्रामीण भागात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून त्यांची जबाबदारी असताना ती जबाबदारी हिवताप विभागाकडे सोपवून आपल्याकडील जबाबदारी झटकण्याचे काम त्यांच्याकडून करण्यात आले. तसेच कर्मचाऱ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार त्यांच्याकडून होत असल्याची

**जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून आपल्या कामाच्या जबाबदारी झटकण्याचे काम मागील महिनाभरात झाले असून, बदल्यांच्या फाईल रोखण्याचा प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे डॉ. बास्टेवाड यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांचा पारा चढला. त्यांनी याबाबत विखेंना जाब विचारला.**



चर्चा आरोग्य विभागात जोरात सुरु आहे. आरोग्य विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. बदल्यांची फाईल रोखण्याचे काम त्यांच्याकडून झाल्याचा प्रकार मुख्य कार्यकारी अधिकारी बास्टेवाड यांच्या लक्षात आला. त्यांनी ती फाईल मंगळवारी मागविली. त्यावेळी त्यांच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केल्याची चर्चा जोरात सुरु आहे. आरोग्य अधिकाऱ्यांच्या या प्रकाराबाबत त्यांच्याविरोधात निलंबनाची कारवाई करण्यासाठी बास्टेवाड यांनी सुरूवातही केली होती. परंतु, त्यांना सुधारण्याची संधी देत कारवाई तूर्तास थांबविल्याचे समोर आले आहे. याबाबत डॉ. बास्टेवाड व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकला नाही.

## नगराध्यक्षपदाची ४ ऑक्टोबरला निवडणूक

- **जिल्हाधिकारी जावळेंकडून निवडणूक जाहीर**
- **कार्यकाळ पूर्ण झाल्याने पवार यांचा राजीनामा**

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी आपला नगराध्यक्षपदाचा ठरल्याप्रमाणे अडीच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने नुकताच जिल्हाधिकाऱ्यांकडे राजीनामा दिला. या रिक्त झालेल्या पदासाठी निवडणुकीचा कार्यक्रम जिल्हाधीकारी किशन जावळे यांनी जाहीर केला असून, दि.४ ऑक्टोबरला ही निवडणूक होणार आहे.

या निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र माणगाव नगरपंचायत कार्यालय सभागृहात अधिकाऱ्यांकडे दाखल करायचे आहेत. या निवडणुकीचा कार्यक्रम नामनिर्देशन अर्ज स्वीकारणे शुक्रवार दि.२७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत, निवडणुकीचे पिठासन अधिकारी यांच्याकडून नामनिर्देशन अर्जाची छाननी दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी २ नंतर, नामनिर्देशन पत्रे फेटाळण्यात आलेली आहेत. त्या उमेदवारांची नावे आणि नामनिर्देशन पत्रे फेटाळण्याची करणे सूचना फलकावर प्रसिद्ध करणे दि.२७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत, पिठासन अधिकाऱ्याचे निर्णयाविरुद्ध अपील दाखल करण्याचा कालावधी शुक्रवार दि.२७ सप्टेंबर सायंकाळी ५ पासून ते मंगळवार दि. १ ऑक्टोबर २०२४ सायं. ५ वाजेपर्यंत वैध नामनिर्देशन पत्राची यादी सूचना फलकावर प्रसिद्ध करणे दि.१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजल्यानंतर, उमेदवारी मागे घेणे दि.३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत,उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करणे (वर्णानुक्रमे) दि. ३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ नंतर, अध्यक्षपदासाठी निवडणूक विशेष सभा दिनांक व वेळ दि.४ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता, निवडणूक लढविणाऱ्या व उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे विशेष सभेत वाचून दाखविणे १२ वाजून ५ मिनिटानंतर, अध्यक्षपदाची निवडणूक घेणे व निकाल घोषित करणे दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजून १० मिनिटानंतर असा कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडून जाहीर करण्यात आला आहे.

**शासनाचे धोरण कुचकामी, सोयीसुविधांचा अभाव**

# 'आपला दवाखाना' बंद होणार?

- **औषधांचा साठा पुरेसा नसल्याने उपचारात अडचण**
- **पाण्याचे कनेक्शन नसल्याने येणाऱ्या रुग्णांचे हाल**

**| माथेरान | वार्ताहर |**

राज्य सरकारच्या माध्यमातून अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. याचा असंख्य गरजवंताला लाभ मिळत आहे. वैद्यकीय सुविधासुद्ध 'आपला दवाखाना' या माध्यमातून सर्वांना मोफत तपासणी आणि उपचार केले जात आहेत. परंतु, अनेक ठिकाणी ही कल्याणकारी योजना बारगळत चालल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

माथेरान या दुर्गम भागातसुद्धा जिल्हा परिषदेच्या वतीने आपला दवाखाना सुरू आहे. परंतु, काही महिन्यांपूर्वी या दवाखान्यात सोयीसुविधांचा अभाव प्रकर्षाने जाणवत असल्याने नाईलाजाने रुग्णांची आत्मीयतेने सेवा करणाऱ्या एमबीबीएस डॉक्टरांना दवाखाना सोडून जाण्याची वेळ आली आहे. कोरोना काळात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अनेकांना जीवदान दिलेल्या डॉ. प्रशांत यादव यांनी शासनाच्या कुचकामी धोरणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



याबाबत प्रशांत यादव यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, शहराच्या मध्यवर्ती भागात आपला दवाखाना असून, या दवाखान्यात पुरेसा औषधांचा साठा नसून साधे पाण्याचे कनेक्शनसुद्धा नाही. औषधांची मागणी केल्यास खूपच कमी प्रमाणात औषधे दिली जातात. महत्त्वाच्या गोळ्या, इंजेक्शने त्याचप्रमाणे रुग्णांना बेड, ड्रेसिंगचे साहित्यसुद्धा उपलब्ध नाही. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आपला दवाखाना असून, काही औषधे पान २ वर

### राजकारण्यांना विसर

**बाराही महिने राजकारण करणाऱ्या येथील राजकीय पक्षाच्या नेत्यांना या दुर्गम गावाविषयी काडीमात्र सहानुभूती दिसत नाही. प्रशांत यादवसारखा अभ्यासू एमबीबीएस डॉक्टर या गावात उपलब्ध असताना त्यांना आपला दवाखान्यात काय काय अडचणी येत आहेत. ज्यांनी कोरोना काळात अनेकांना जीवदान दिले आहे असे डॉक्टर हे गाव सोडून गेले तर गोरगरीब रुग्ण कुठे जाणार? राजकारण बाजूला ठेवून राजकीय पक्षांनी याबाबत सविस्तर माहिती घेऊन आपला दवाखाना बंद होण्यापासून वाचवणे गरजेचे बनले आहे.**




पान १ वरून

## ‘तिसरा डोळा’ निधीहीन

उपाययोजना करण्यासाठी एक महिन्याच्या आत शाळांनी सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, अन्यथा शाळेची मान्यता व अनुदान रोखले जाईल, अशी सक्त ताकीद दिली. जिल्हा परिषदेच्या शाळेत कॅमेरे बसविण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीची राहिली. मुख्याध्यापकांनी आठवड्यातून तीन दिवस सीसीटीव्ही कॅमेरेचे फुटेज तपासावे. आक्षेपार्ह आढळून आल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, अशा सूचना शासनाने दिल्या होत्या.

रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद, महानगर पालिका, नगरपरिषद, नगर पंचायतीच्या दोन हजार ६२२, खासगी ७४ व विना अनुदानित २०४ अशा एकूण दोन हजार ९०० शाळा आहेत. या शाळांपैकी ३०६ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यात जिल्हा परिषद, नगरपरिषद, महानगरपालिकेतील ७५, खासगी ५१ व विना अनुदानित १८० शाळांचा समावेश आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी नसल्याने शिक्षण विभागाने मागील पंधरा दिवसांपूर्वी निधीसाठी जिल्हा नियोजन समितीकडे मागणी केली. मात्र, अद्याप त्याची पूर्तता झाली नसल्याची माहिती समोर येत आहे. सरकारनेच महिन्याच्या आत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या सूचना करूनदेखील सरकारकडूनच कॅमरे बसविण्यासाठी वेळेवर निधी न देणे, ही मोठी शोकांतिका असल्याचे बोलले जात आहे.

एका बाजूला विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी जाहिरातबाजी करायची आणि दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी निधी वेळेवर न देणे, ही मोठी चिंतेची बाब असल्याचे बोलले जात आहे. जिल्हा नियोजन समितीने याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असताना ही कामे संथगतीने का होत आहेत, असा सवाल जिल्ह्यातील नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

## जुन्या पेंशनसाठी शिक्षक आक्रमक

शिक्षक नेमण्याचा निर्णय घेतला आहे. वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक घेण्याच्या हालचाली सुरु झाल्या. सरकारचा हा निर्णय अन्यायकारक आहे, असा आरोप शिक्षकांनी केला आहे.

सरकारच्या या निर्णयाविरोधात बुधवारी जिल्ह्यातील शिक्षकांनी एकत्र येऊन मोर्चा काढला. सर्व प्राथमिक शिक्षक संघटना जिल्हा रायगडच्या वतीने अलिबागमधील क्रीडा भुवन येथून दुपारी मोर्चाला सुरुवात झाली. प्राथमिक शिक्षक संघ, शिवाजी घट, शिक्षक समिती, शिक्षक सेना, आखिल प्राथमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना, शिक्षक परिषद, आदर्श शिक्षक समिती, शिक्षक भारती, पुरोगामी शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना, जय महाराष्ट्र शिक्षक व कर्मचारी सेना, पदवीधर शिक्षक व केंद्र प्रमुख संघटना, कास्ट्राईब शिक्षक संघटना प्रोटॉन रायगड अशा अनेक संघटना या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. ‘एकच मिशन जुनी पेन्शन, शाळांमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करा’ अशा घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षक धडकले. हिराकोट तलावाजवळ आल्यावर मोर्चाचे स्वरूप सभेत झाले. वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षकांनी संबोधित केले. यावेळी शिक्षकांनी त्यांच्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दिले. त्यामध्ये १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करा, वीसपेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांच्या बाबतीत कार्यरत शिक्षकांचे एक पद बंद करण्याचा आणि कंत्राटी सेवानिवृत्त व अन्य नियुक्ती देण्याचा निर्णय रद्द करा, आधारकार्ड अधारित शिक्षक पद निर्धारण धोरण रद्द करा, २००५ नंतर सेवेत लागलेल्या प्राथमिक शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना १९८२ ची पेन्शन आदेश निर्गमित करावी, विद्यार्थ्यांना मोफत गणवेश अविलंब मिळावे, जुन्या पद्धतीने गणवेश योजना कार्यान्वित करावी, तातडीने पाठ्यपुस्तके पुरविण्यात यावीत, पाठपुस्तकांना कोरी पाने न देता स्वतंत्र स्वाध्याय पुस्तिका द्यावात, शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र यंत्रणेकडे द्यावी, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त शिक्षकांना टीईची अनिवार्यतेचा शासन निर्णय रद्द करावा, प्राथमिक शिक्षकांना मुख्यालयी निवासाची सक्ती रद्द करणे, शिक्षकांचे वेतन शालार्थ प्रणालीत ई-कुबेर अंतर्गत व्हावे, अशा अनेक मागण्या त्यांनी सरकारकडे केल्या आहेत.

यावेळी शिक्षक समितीचे विजय येलवे, दिपक पाटील, मंदार रसाळ, रोशन तांडेल, सुभाष भोपी, किशोर पाटील, कुमार खामकर, उदय गायकवाड आदी पदाधिकारी व शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या.

शिक्षकांनी त्यांच्या मागण्यांसाठी सामूहिक रजा आंदोलन केले होते. शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी योग्य ते नियोजन करण्याच्या सूचना केल्या होत्या. जिल्ह्यातील सुमारे दीड हजार शिक्षण सेवकांच्या मदतीने शाळा सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी अन्य शाळेतील शिक्षकांना बोलावण्यात आले होते, अशी माहिती प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

## रुग्णालयाचा स्लॅब कोसळला

दुरुस्ती करू शकता, असे सांगण्यात आले होते. त्यामुळे करोडो रुपयांचा निधी खर्च करून इमारतीची दुरुस्ती सुरु आहे. मात्र, रुग्णालयाच्या इमारतीमधील स्लॅब कोसळण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालयातील तळ मजल्यावर असलेल्या स्वयंपाकगृहाची अवस्था बिकट आहे. बाजूच्या परिसरात गवत वाढले असून, दुर्गंधी मोठ्या प्रमाणात आहे. सांडपाण्याच्या नियोजनाचा अभाव असल्याचा फटका वारंवार बसत आहे. या स्वयंपाकगृहाच्या भिंतींना तडे गेले असून, ठिकठिकाणी स्लॅब निघू लागले आहे. त्यामुळे येथील कामगार जीव मुठीत घेऊन काम करीत आहेत. बुधवारी दुपारी येथील महिला व अन्य कामगार स्वयंपाक करण्यामध्ये मग्न होते. त्यावेळी अचानक दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास स्वयंपाकगृहातील भला मोठा स्लॅब खाली कोसळला. सुदैवाने तेथील कोणालाही इजा झाली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, रुग्णालयातील सुरक्षेचा प्रश्न गंभीर असतानाही सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. कर्मचाऱ्यांसह रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या जीवाशी खेळ सार्वजनिक बांधकाम विभाग खेळत असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

## रेल्वेचे फाटक चार दिवस बंद

त्यात त्या ठिकाणी मुंबई-पुणे मेन लाईनवरील गाड्यांची वाहतूक सतत सुरू असते, तसेच उपनगरीय लोकल गाड्यांची वाहतूक सुरू असते. तर, रस्ते मार्गाने जाणाऱ्या गाड्यांची तसेच अवजड वाहनांची वाहतूकदेखील सतत सुरू असते. मध्य रेल्वेकडून दुरुस्तीची कामे करण्यासाठी २६ सप्टेंबर सकाळपासून ३० सप्टेंबर दुपारी बारापर्यंत फाटकामधून रस्ते मार्गाने होणारी वाहतूक बंद ठेवली जाणार आहे. सलग चार दिवस फाटक बंद ठेवणे स्थानिकांसाठी प्रचंड त्रासदायक ठरणार आहे. हे फाटक बंद ठेवले जाणार असल्याची माहिती मध्य रेल्वेचे नेरळ स्थानक आणि नेरळ ग्रामपंचायतीचे वतीने देण्यात आली आहे.

## ‘आपला दवाखाना’ बंद होणार?

मागविली असता कर्जत येथून घेऊन जा, असे सांगण्यात येते. हा वाहतुकीचा खर्च आम्ही स्वतः कसा करणार, हाही प्रश्न निर्माण झाला आहे. एकदा येथील नगरपरिषदेच्या दवाखान्यातून दोन महिन्यांची काही औषधे घेतली होती; परंतु आपला दवाखान्यात सर्व मोफत असल्यामुळे बहुतांश सर्वच रुग्ण इकडे धाव घेत असतात. एखाद्या रुग्णाला नगरपरिषदेच्या दवाखान्यात ॲडमिट केल्यास त्या रुग्णाला औषधे दिली जात नाहीत. मागील काळात आम्ही जवळपास पंचवीस रुग्णांच्या चरबीच्या गाठी काढल्या आहेत. ही कामे करण्यास आम्ही जर का टाळाटाळ केली असती, तर त्या रुग्णाला अन्य ठिकाणी जाऊन उपचार घेणे खूपच खर्चिक बाब होती, अशी माहिती डॉ. प्रशांत यादव यांनी दिली.

## झेनिथ धबधब्यात तरुणी गेली वाहून

बुधवारी (दि.२५) दुपारी ती वाजण्याच्या सुमारास गेले होते. झेनिथ धबधब्याचा ओढा ओलांडत असताना अचनाक पावसाचा जोर वाढला. नदीला पूरपरिस्थीती निर्माण झाली. यादरम्यान स्वप्नालीचा भाऊ आणि दोन बहिणी सुखरूप बाहेर निघाल्या. मात्र, स्वप्नाली नदीच्या प्रवाहात आडकल्याने वाहून गेली.

या घटनेची माहिती मिळताच अपघातग्रस्त टीमने घटनास्थळी पोहचून शोधमोहीम सुरू केली. पुढे विहारी, रहाटवडे, पेप्पो, आयओसी, डीपी, शिळफाटा येथील पुलाखाली अपघाग्रस्त टीमचे सदस्य थांबवून राहिले. पाताळगंगा नदीला गढूळ पाणी तसेच संध्याकाळी अंधार पडल्यामुळे शोधमोहिमेला अडथळा येत असतानाच खालची खोपोलीत पेम्पो कंपनीच्या पुलाखाली थांबलेले योगेश औटी, सुनिल पुरी यांनी तरूणीचा मृतदेह सापडला आहे. घटनास्थळी खोपोली पोलिस,अपघातग्रस्त टिमने पोहचून मृतदेह बाहेर काढला आहे. पुढील तपास वरीष्ठ पोलिस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

---

**महाराष्ट्र शासन**
**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड**
**जिल्हा रायगड ४०२३०१**
Email: rpdmahad.ee@mahapwd.com Ph. No.०२१४५ २२२२४३

**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ०९ सन २०२४-२५**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. कोऱ्या निविदा नमुना दिनांक २४/०९/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०१/१०/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील व कार्यकारी अभियंता मा.प्र.विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक ०३/१०/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | ई-निविदा संचाची किंमत | नोंदाणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वारंगी बौध्दवाडी येथे सामाजिक सभागृह बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | २०५५०१६.०० | २१०००.०० | ६ महिने | ५९०/- | वर्ग ५ अ वरील |
| २. | बावळे विहीर दुरुस्ती करणे, ता. महाड, जि. रायगड. | ८५२२४२.०० | ९०००.०० | ३ महिने | ५९०/- | वर्ग ७ वरील |
| ३. | सावरट खडकवाडी सभागृह बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | ८५१६८५.०० | ९०००.०० | ३ महिने | ५९०/- | वर्ग ७ वरील |
| ४. | हिरकणीवाडी स्मशानभूमि कडे जाणारा रस्ता तयार करणे, ता. महाड, जि.रायगड. | ८५००६४.०० | ९०००.०० | ३ महिने | ५९०/- | वर्ग ७ वरील |
| ५. | बावळे स्मशानभूमि बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | २५४३४०.०० | ३०००.०० | ३ महिने | ५९०/- | वर्ग ७ वरील |

टिप:- तपशिलवार निविदा सुचना कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयीन फलकावर पहावयास मिळेल.

जा.क्र.: मवि/लेशा/निविदा/४७७
दिनांक : २०/०९/२०२४.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड**

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/९०**

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर सूचनेद्वारे असे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल १) केसरीनाथ भास्कर चिंबुलकर २) सुधाकर भास्कर चिंबुलकर आणि ३) श्रीनिवास भास्कर चिंबुलकर, सर्वजण मुक्काम सातिर्जे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड यांच्या खुद्द मालकीची आणि ताबेवहिवाटीची जमीन मिळकत जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी, गाव सातिर्जे येथील असून, आजमितीस खालील वर्णनाची आहे.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२८ | ३/२ | ३-३५-८ | २६-५२ |

यापूर्वी सदर मिळकतीचे गट क्रमांक १२८ क असे वर्णन होते.

आमच्या अशिलांच्या सदर मिळकती पासून काही अंतरावर ‘‘श्री कनकेश्वर देवस्थान’’ हे प्रसिद्ध मंदिर आहे. सदर मंदिराच्या परिसरामधील जमीन मिळकती विकत घेणाऱ्या काही इसमांनी, त्यांना जा-ये करण्याचा मूलत: असणारा मार्ग केवळ चार फूट रुंद असल्यामुळे आमचे अशिलांनी सदर मूळचा आमचे अशिलांच्या जमीन मिळकतीच्या दक्षिणेकडील लगतच्या मिळकतीमधून असणारा अरुंद रस्ता जा ये करण्याकरता आणखी थोडा वाढवून द्यावा अशी विनंती केली. सदर व्यक्तींनी आमचे अशिलांकडून तारीख २४ जुलै २००२ रोजी वर नमूद केल्यानुसार रस्त्याची रुंदी वाढवून घेण्याकरिता नोंदणीकृत करारनामा मोबदल्या पोटी करून घेतला आहे. त्यानुसार आमचे अशीलांनी त्यांच्या मिळकतीच्या लगत दक्षिणेकडील मिळकतीमधून असणाऱ्या चार फूट रुंदीच्या मूळ पायरस्त्याला लागून आणखी सहा फूट फूट रुंदीचा रस्ता वापरण्याचा हक्क, करार करून घेणाऱ्या विशिष्ट व्यक्तींना दिला आहे. सदर करार आमचे अशिलांनी ज्या व्यक्तीबरोबर केला आहे त्यांनाच सदर सहा फूट रुंदीचा रस्ता वापरण्याचा हक्क आमचे अशिलांनी दिला आहे. तरी आमचे अशिलांनी दिलेला सदर रस्त्याचा वापर करण्याचा हक्क खाजगी स्वरूपाचा असून तो सार्वजनिक रस्ता नाही.

वर नमूद केलेल्या आमचे अशिलांकडून विशिष्ट कराराने हक्क मिळवणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त सदर परिसरातील अन्य जमीन मालक देखील कोणत्याही अधिकाराविना बेकादेशीरपणे सदर रस्त्याचा वापर करत असल्याचे आमचे अशिलांचे लक्षात आले आहे. अशा प्रकारचा वापर बेकायदेशीर आहे.

तरी या नोटीसने सर्वांना असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांकडून नोंदणीकृत कराराद्वारे रस्त्याचा हक्क घेणाऱ्या विशिष्ट व्यक्तींशिवाय अन्य कोणीही सदर रस्त्याचा बेकायदेशीरपणे वापर करू नये. अन्यथा संबंधितांविरुद्ध आमचे अशिलांस कायदेशीर कारवाई करणे भाग पडेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २५/०९/२०२४

सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को.ऑप.होसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड

---

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिका असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सौ. किरण प्रकाश किंजवडेकर २) श्री. प्रकाश दत्ताराम किंजवडेकर दोघेही रा. सुखी जीवन सोसायटी, जुनी पोस्टाची गल्ली अलिबाग मु पो.ता अलिबाग जि रायगड यांच्याकडून सदरची निवासी सदनिका कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला असून सदर निवासी सदनिका ही मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग येथील अलिबाग नगरपरिषद अलिबाग हद्दीतील तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ६९३-ए, ६९४/२,६९४/३,६९४/४ सर्व्हे नं. १६८/डी/२७/ए१, प्लॉट नं.४-बी या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेली ‘‘सुखी जीवन गृहनिर्माण सोसायटी मर्या.अलिबाग,ता.अलिबाग,जि. रायगड’’ या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक ‘सी-४’ क्षेत्र ५७५ चौरस फूट बिल्टअप (त्याचा अलिबाग नगर परिषद मालमत्ता क्र. Z1JBM001122 जुना नं. ALB000001120, ८३० सी विंग सदनिका क. १०१) ही निवासी सदनिका या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर निवासी सदनिका मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आणून द्यावीत याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख -२६/०९/२०२४

सही /-
**ॲड.शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर, ता.अलिबाग जि. रायगड.

---

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

### मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव सोमवार दिनांक २८/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळुन (७ दिवस) दिनांक २५/१०/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे .**

| अ. क्र. | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसुली दाखला क्र व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार**<br>१. श्री मिलींद एकनाथ म्हात्रे पत्ता:- मु. नवेगांव, पो. डोलवी ता.पेण रायगड<br>**जामिनदार**<br>२. श्री प्रदीप गणेश वर्तक पत्ता :- मु. पो. मोठे भाल ता. पेण जि.रायगड<br>३. श्री सुनिल सुधीर म्हात्रे पत्ता :-मु. पो. वडखळ . ता. पेण जि रायगड | अर्ज क्र./ ५४/२२/२५१ जा.क्र. सनिपवे/वशी-१/१०१ /सन २०२३ दिनांक १५/०३/२०२३ | राखीव किंमत रक्कम रु. ७१,०४०००/- (अक्षरी एक्काहत्तर लाख चार हजार मात्र) | श्री. एकनाथ गणू म्हात्रे यांचे नावे असलेली मोजे वावे ता. पेण येथील जमिन गट क्र. २१/१ क्षेत्र ०-१९-२० हे आर ही मालमत्ता |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**
**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२)लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३)वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५)सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७)ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८)विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
(१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११)पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२)ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
(१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६)सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७)महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
(१८)जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : २५/०९/२०२४

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

---

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५-१६

### मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव सोमवार दिनांक २८/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि.रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र ) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळुन (७ दिवस) दिनांक २५/१०/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे .**

| अ. क्र. | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसुली दाखला क्र व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **कर्जदार**<br>१. श्री जनार्दन रामचंद्र पाटील पत्ता:- मु. पो. रावे ता. पेण रायगड<br>**जामिनदार**<br>२. श्री देवेंद्र अशोक म्हात्रे पत्ता :- जय भवानी मंदीरा जवळ दिव पो. वाशी ता. पेण जि. रायगड<br>३. श्री हरिश्चंद्र पांडुरंग नाईक पत्ता :- मु. बौद्धधनगर, पो. ता. पेण जि. रायगड | अर्ज क्र ५३/२२/५२८ जा.क्र. सनिपे/वशी-१०/१०१ सन २०२३ दिनांक १५/०३/२०२३ | राखीव किंमत रक्कम रू. २३,३६,९२०/- (अक्षरी तेवीस लाख छत्तीस हजार नऊशे वीस मात्र) | श्री जनार्दन रामचंद्र पाटील व सौ रेखा जनार्दन पाटील यांचे नावे असलेले मौजे ग्रामपंचायत रावे ता. पेण हद्दीतील मालमत्ता क्र. ३०८/ब/१ क्षेत्र ५७५ चौ. फुट व मालमत्ता क्र. ३०८/ब/३ क्षेत्र ५७५ चौ.फुट या दोन्ही मालमत्ता |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**
**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२)लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३)वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५)सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७)ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८)विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
(१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११)पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२)ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
(१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६)सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७)महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
(१८)जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : २५/०९/२०२४

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

**निवडक**

## ‘मुद्देमाल कारकून महत्त्वाचा’

**पनवेल :** प्रत्येक पोलीस ठाण्यात मुद्देमाल कारकून हा महत्वाचा घटक असतो. पनवेल शहर पोलीस ठाण्यात या ठिकाणी कार्यरत असणारे पोलीस हवालदार रवींद्र कुंभार यांनी त्यांच्यावर सोपविलेला कारभार हा २०१७ पासून प्रामाणिकपणे पार पाडला. त्याचे कौतुक संपूर्ण पोलीस ठाण्याला असल्याचे प्रतिपादन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांनी पोलीस हवालदार रवींद्र कुंभार यांच्या बदलीनिमित्त त्यांचा विशेष सत्कार करताना केले.

## सहाव्या आरोपीला अटक

**पनवेल :** दिवसा नोकरी करून रात्रीच्यावेळी एक्सप्रेस महामार्गावर लूटमार करणाऱ्या एका सराईत टोळीतील सहाव्या आरोपीला पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केले आहे. त्याच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. काही दिवसांपुर्वी पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर ट्रक चालक गेंदलाल पटेल हे पळस्पे याठिकाणी थांबले असता अज्ञात सात इसमांनी त्यांना ठार मारण्याची धमकी देत जबर मारहाण करून त्याच्याकडील मोबाईल व २३ हजार रु. रोख रक्कम चोरी केली होती.

## ऐन पावसाळ्यात पाणीटंचाई

**पनवेल :** ऐन पावसाळ्यात तळोजा वासियांना पाण्यासाठी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. काहीवेळा पाणि विकत घ्यावे लागत आहे. वसाहतीमधील पाणी समस्या दूर व्हावी यासाठी तळोजा फेडरेशनकडून अनेकवेळा पत्रव्यवहार आणि आंदोलन करुनही सिडकोकडून पाणी समस्येवर उपाययोजना केली जात नाही. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी तळोजा वसाहतीला भेट देऊन सिडकोकडून पुरविल्या जाणाऱ्या पाणी पुरवठा विषयी माहिती घावी, अशी मागणी तळोजा वासियांकडून केली जात आहे.

## भरत जाधव यांची नियुक्ती

**पनवेल :** परिसरात विविध संस्थांमध्ये सामाजिक कार्य करणारे भरत जाधव यांची दिव्यांग विकास फाऊंडेशन प्रणित दिव्यांग हक्क संघर्ष समितीच्या पनवेल शहराध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष बापूराव काणे यांनी भरत जाधव यांची ही नियुक्ती जाहीर केली असून याबाबतचे नियुक्तीपत्र त्यांना देण्यात येऊन त्यांनी दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यासाठी हिरीहिरीने काम करावे. तसेच, दिव्यांगांचे कार्य तळागळात पोहोचवावे, अशा शुभेच्छा त्यांना दिल्या आहेत.

## मराठा समाजाचे उपोषण

**पनवेल :** आरक्षणाच्या मुद्यावर महाराष्ट्र सरकार मराठा समाजाला खेळवत असल्याने जरांगे पाटील हे आपल्या जीवाची पर्वा न करता समाज बांधवांसाठी आमरण उपोषणाला बसले आहेत. जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी खांदा वसाहतीमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाजातर्फे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. या उपोषणाला मोठ्या प्रमाणात समाज बांधव तसेच भगिनी सहभागी झाल्या होत्या.

# संघर्ष समितीचा बेमुदत आंदोलनाचा इशारा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

**खोपोली नगरपालिका हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते दिपक हॉटेल चौक हे वर्दळीचे ठिकाण असून रेल्वे स्टेशन ते बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर ट्रॅफिक असल्याने नागरिक त्रस्त झालेले आहेत. परंतु, याठिकाणी रस्त्यावर बसणारे फेरीवाले व बाहेरून येणारे व्यावसायिक यांच्यामुळे शहरात ट्रॅफिकची समस्या गंभीर स्वरूप धारण करीत आहे. याकडे पालिका अधिकारी दुर्लक्ष करत असून त्यांच्यावर कारवाई करत अतिक्रमण उठविण्यात आले नाही तर खोपोली पालीकेच्या समोर बेमुदत आंदोलन करणार असल्याचे खोपोली-खालापूर संघर्ष समितीकडून सांगण्यात आले आहे.**

खोपोली नगरपालिकेच्या माध्यमातून अतिक्रमण विरोधी पथकोन याकामी सक्रिय असणे गरजेचे होते. परंतु, संपूर्ण शहरात अतिक्रमणाचा विळखा बसला असून खोपोली शहर चिंताग्रस्त श्रेणी मध्ये येत आहे. शहरातील या प्रश्नावर लक्ष ठेवून मार्ग काढणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. परंतु, याकामी खोपोली नगरपालिकेची प्रशासकीय यंत्रणा सपशेल अपयशी ठरताना दिसत आहे. यासंदर्भात खोपोली-खालापूर संघर्ष समितीने पालिकेशी २ सप्टेंबर रोजी पत्रव्यवहार केला होतो. तरीदेखील या समस्येत काहीही फरक पडलेला

- ➪ **खोपोलीत वाहतुक कोंडीची समस्या**
- ➪ **नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष**
- ➪ **अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी**



दिसत नाही. यामुळे हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून लवकरात लवकर अतिक्रमण उठण्यासाठी लाक्षणिक प्रयत्न न केल्यास संघर्ष समितीच्या माध्यमातून २ ऑक्टोबरपासुन खोपोली नगरपरिषद कार्यालया समोर बेमुदत आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

संघर्ष समितीने या समस्येबाबत पोलीस प्रशासनासोबत चर्चा केली असता ते देखील संयुक्त कारवाई करण्यास तयार आहेत. ही समस्या मिटवण्यासाठी समाजातील सर्व स्तरांचा पाठिंबा मिळत असून या समस्येतून मार्ग निघेल, असा आशावाद स्थानिक व्यक्त करीत आहेत. तसेच, शहरातील नागरी समस्येमुळे शहराची प्रगती खुंटून सर्वसामान्य जनजीवन विस्कळीत होत आहे. संघर्ष समिती नागरी समस्या सोडविण्यासाठी शहरातील जाणकार मंडळींकडून मार्गदर्शन घेऊन लढा देत आहे. हा लढा शहरासाठी क्रांतीचे पावूल असून नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग ही नक्कीच जमेची बाजू आहे, असे प्रतिपादन खोपोली-खालापूर संघर्ष समितीने व्यक्त केले आहे.

# शेकापच्या मागणीला यश

## डेली बाजार येथील वाहतूक सिग्नल सुरू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर हे झपाट्याने वाढत असलेले शहर असून सेक्टर-१३ येथील हावरे डेली बाजार चौक हा रहदारीचा चौक म्हणून गणला जातो. यामुळे या ठिकाणी वाहतूक सिग्नलची व्यवस्था करण्यासाठी खारघरमधील शेकाप कार्यकर्ते जगदीश घरत आणि शहर महिला आघाडी प्रमुख तेजस्विनी घरत यांनी ९ स्पटेंबर रोजी पनवेल महानगरपालिका व ट्राफिक विभागाला लेखी अर्ज सादर केले होते. याच अनुषंगाने वाहतूक विभागाने या ठिकाणी सिग्नलची व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. यामुळे शेतकरी कामगार पक्षाच्या मागणीला मोठे यश मिळाल्याचं बोलले जात आहे.



यावेळी शेकापचे जगदीश घरत यांनी सांगितले की, या कामासाठी आम्हाला आ. बाळाराम पाटील व पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक देवेंद्र मढवी यांनी मोलाचे सहकार्य केले. या उद्घाटन सोहळ्याला खारघर शेकाप नेते जगदिश घरत, तेजस्वी घरत, जीवन ठाकुर, अभय मोरे, गणेश पाटेकर, जीवन घरत, रुपेश घरत, आर.एस.हांडा, गणु घरत, भारती सावंत, सागर आडे, वंदना वेंगुर्लेकर, सेजल शर्मा आदी उपस्थित होते.

## महेश निकम यांना मातृशोक

**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

पोयनाडविभागतलाठीसजाचे मंडळधिकारी महेश लक्ष्मण निकम यांची आई सुमती लक्ष्मण निकम (८५) यांचे १७ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. अलिबाग तालुक्यातील महसूल



विभागाचे सर्व अधिकारी व तलाठी, कर्मचारी यांनी निकम यांच्या मातोश्री यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांचे दशक्रिया विधी गुरूवारी (दि.२६) सकाळी ८.०० वाजता नारंगी भुनेश्वर येथे होणार आहेत. तसेच, तेराव्याचे विधी रविवारी (दि.२९) अलिबाग गोंधळपाडा येथील बे-वूड्स सोसायटीत होणार आहेत.

## राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

**। माणगाव । प्रतिनिधी।**

माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा वाणिज्य विद्यालयात मंगळवारी (दि.२४) राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त महाविद्यालयातील राष्टीय सेवा योजना विभागाच्या ९० विध्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाविषयी सविस्तर माहिती प्राचार्य हर्षल जोशी यांनी दिली. तसेच, कार्यक्रम अधिकारी जगदीश शिगवण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागतर्फे अनेक समाज उपयोगी कामे केली जातात. यामध्ये रक्तदान शिबीर, स्वच्छता मोहीम, एडस जनजागृती, नवमतदार नोंदणी, रस्ता सुरक्षा अभियान, विविध शैक्षणिक उपक्रम, निवासी शिबिर, प्लास्टिक मुक्त भारत रॅली, पथनाट्य याद्वारे जनजागृती केली जाते.

यावेळी अशोक मोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व व युवकांची भूमिकेबद्दल आपले विचार मांडले. डॉ. नितीन मुटकुळे यांनी राष्ट्रीय सेवा योजना हि एक संधी असून केवळ १० मार्कांसाठी यामध्ये सहभाग न घेता समाज सेवा करण्यासाठी या योजनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन सर्व विद्यार्थ्यांना केले.



## शहरातील समस्यांचे निवेदन नगरपरिषदेकडे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील नगरपरिषद हद्दीत राहणाऱ्या नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्येंबाबत कर्जत शहर विकास समिती कार्यरत आहे. या समितीच्या माध्यमातून शहरातील २६ समस्यांचे निवेदन कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी यांना देण्यात आले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आलेल्या मागण्यांचा अभ्यास आणि त्यावर कोणत्या उपाययोजना केल्या, याची माहिती मुख्याधिकारी शनिवारी (दि.२८) पालिका संघर्ष समिती समोर ठेवण्यात येणार आहेत. दरम्यान, समस्यांवर नागरिकांचे समाधान झाले नाही तर त्याच दिवशी कर्जत पालिकेविरोधातील आंदोलनाची दिशा जाहीर करणार असल्याचे संघर्ष समितीकडून सांगण्यात आले आहे.

कर्जत शहरातील नागरी समस्यांबाबत कर्जत शहर विकास समिती आवाज उठवत आहे. याच



माध्यमातून रविवारी (दि.२२) शनी मंदिर येथे झालेल्या बैठकीत शहरातील समस्यांचा आढावा घेणारे निवेदन पालिका मुख्याधिकारी यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुसार ॲड. कैलाश मोरे यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नागरी समस्यांचे निवेदन देण्यासाठी कर्जत शहर विकास समितीच्या आवाहनानंतर असंख्य कर्जतकर पालिका कार्यालयात जमले होते. यात माजी नगराध्यक्ष राजेश लाड, माजी नगरसेवक संतोष पाटील, सुनील गोगटे, सोमनाथ ठोंबरे, मोहन ओसवाल, राजाभाऊ कोठारी, भानुदास पालकर, दिलीप गडकरी, सुरेश खानविलकर, मल्हारी माने, रणजित जैन, राजेश ओसवाल, विजय हरिश्चंद्र, ॲड. गोपाळ शेळके, अनिल भोसले, अशोक दिघे, ॲड. भारती ढाकवळ, स्विटी बार्शी, सतीश मुसळे, अनिल मोरे, सुहास प्रधान, प्रशांत उगले, सोमनाथ पालकर, समीर चव्हाण, अशोक शिंदे, प्रभाकर करंजकर, रंजन दातार, कृष्णा जाधव यांच्यासह महिला नागरिकांनी पालिका मुख्याधिकारी यांना निवेदन सादर केले आहे.

## विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता प्रतिवर्षी रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणाऱ्या गौरीशंकर मिठाईवाले परळ-मुंबई यांच्याकडून यावर्षीही मंगळवारी (दि.२४) ३ हजार ५०० वह्यांचे वाटप सप्टेंबर करण्यात आले. कृष्णा महाडिक यांच्या माध्यमातून प्रतिवर्षी रायगड जिल्ह्यातील विविध शाळांना शैक्षणिक साहित्याची मदत देण्यात येते. यावर्षीही प्रसिद्ध मिठाईवाले गौरीशंकर मिठाईवाले यांच्याकडून दक्षिण रायगड जिल्ह्यातील २४ शाळांमध्ये ३ हजार ५०० विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक पूष्कराज सूर्यवंशी, मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे तसेच तळा, माणगाव, रोहा, म्हसळा, श्रीवर्धन तालुक्यातील २४ विद्यालयांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.








● काही दिवसांवर नवरात्रीला सुरूवात होत असून पनवेलमधील भिंगारी येथील सर्व कारखान्यांत देवीच्या मुर्ती बनविण्याची लगबग सुरू आहे. सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे ओल्या मूर्ति सुकत नसून त्यांच्यावर रंगकाम करण्यासाठी विलंब होत आहे. मूर्तिकार कोळसा जाळून देवीच्या मूर्ति सुखविण्याचा प्रयत्न करित आहेत.

## खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करावी

### ॲड. तुषार पाटील यांची मागणी

**। पनवेल । वार्ताहर ।**

जेएनपीटी हे देशातील सर्वात मोठ्या बंदरांपैकी एक आहे. येथे मालाची ने-आण करण्याकरिता अनेक ठिकाणाहून ट्रेलर, कंटेनर नियमित ये-जा करत असतात. यामुळे या मार्गावर एकंदरीतच अवजड वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या अनुषंगाने जवळपास ३ हजार कोटी रुपये खर्च करून राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करण्यात आले आहे. याचबरोबर या मार्गिका कॉंक्रीट करण्यात आल्या आहेत. मात्र, सद्यस्थितीत या मार्गावर भलेमोठे खड्डे पडले असून अपघाताला निमंत्रण मिळत आहे. यामुळे जेएनपीटी महामार्ग व सर्व्हिस रोडवरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक प्रदेश सरचिटणीस ॲड. तुषार पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदनही दिले आहे.



## आदिवासींच्या प्रश्नांची घेतली दखल

**। पेण । प्रतिनिधी ।**

या देशात सर्व नागरिकांना एकच संविधान असून यामधील अधिकार देखील सर्वांना समान आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र मानवी हक्क आयोग सचिव नितीन पाटील यांनी केले आहे. ते अंकुश ट्रस्ट व लोकमंच या संघटनेने आयोजित केलेल्या हुतात्म्या नाग्या महादू कातकरीच्या स्मृतिदिन निमित्त पेण येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. सन १९९७ मध्ये हुतात्म्या नाग्या महादू कातकरी यांचे नाव चिरनेरच्या मूळ स्तंभावर यावे म्हणून अंकुर ट्रस्ट मार्फत सर्वप्रथम चळवळ उभारण्यात आली होती. कातकरी आदिवासींच्या प्रयत्नांमुळे आता चिरनेरच्या स्तंभावर या हुतात्म्याचे नाव कोरले असून आता पुतळाही उभारण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला टाटा स्टीलचे




प्रकल्प समन्वयक भावेश रावल उपस्थित होते. यावेळी आदिवासींमध्ये कार्य करणाऱ्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ.वैशाली पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकात वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीतील आलेल्या शिथिलतेवर नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, जंगलचा राजा हक्क न मिळाल्यामुळे स्थलांतरित कामगार होत आहे, याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. यावेळी आदिवासी कार्यकर्ते संजय नाईक, ग्रामपंचायत सदस्य अंजली वाघमारे, विद्यार्थिनी निकिता वाघ, वंदना वाघमारे यांनी आपल्या प्रश्नांची मांडणी केली असता मानवी हक्क आयोगामार्फत त्यांच्या प्रश्नांची दखल घेण्यात आली. तसेच, आदिवासींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम करून आपल्या हुतात्म्याचा दिवस साजरा करण्यात आला.

### एसटी महामंडळाचा अभिनव उपक्रम

# उत्पन्नवाढीसाठी मिळणार प्रोत्साहन भत्ता

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

प्रवासी वाहतूक करीत असताना महामंडळाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त उत्पन्न आणणाऱ्या चालक व वाहक यांना एसटीतर्फे रोख प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक फेरी उत्पन्नाचे उद्दिष्ट देऊन ते उद्दिष्ट पूर्ण करुन अतिरिक्त उत्पन्न आणणाऱ्या चालक वाहकांना उद्दिष्टापेक्षा वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून दोघांना सम प्रमाणात वाटण्यात येणार आहे. ही रक्कम त्यांची कामगिरी संपवून आगारात आल्यानंतर त्याच दिवशी रोख




स्वरूपात मिळणार आहे.

एसटी महामंडळाने आपले उत्पन्न वाढावे म्हणून विविध उपयोजना व अभिनव उपक्रम हाती घेतले आहेत. ‘प्रवासी राजा दिन’, ‘कामगार पालक दिन’ यासारखे उपक्रम राबवून प्रवाशांच्या व कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, प्रत्यक्ष प्रवासात प्रवाशांना अडचण आल्यास आगार प्रमुखांचे दूरध्वनी क्रमांक प्रत्येक

■ **अतिरिक्त उत्पन्न आणणाऱ्या चालक, वाहकांना २०टक्के रक्कम मिळणार**

बसमध्ये प्रदर्शित करण्यात आले आहेत. याबरोबरच तोट्यातील आगारांना मार्गदर्शन करण्यासाठी पालक अधिकारी नियुक्त केले आहेत. इंधन बचतीसाठी चालक व यांत्रिक कर्मचारी यांचे समुपदेशन करण्यात येत आहे.

शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत जाऊन पासचे वितरण करण्यात येत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे एसटी महामंडळाने ऑगस्ट २०२४ या महिन्यात १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपये नफा मिळवला आहे. उत्पन्न वाढीत सातत्य राहण्यासाठी चालक-वाहक हा घटक अत्यंत महत्त्वाचा असून त्यांची कामगिरी चांगली व्हावी, त्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळणे अत्यंत आवश्यक आहे. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रायोगीक तत्त्वावर एक महिन्यासाठी वाढीव उत्पन्नावर आधारित प्रोत्साहन भत्ता योजना महामंडळाने सुरू केली आहे.

## अतिश म्हात्रे यांना पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील लेखक कांदबरीकार अतिश अशोक म्हात्रे यांना यंदाचा राज्यस्तरीय आदर्श साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. अतिश म्हात्रे यांच्या ‘जन्मांतर एक रहस्य’ या कांदबरीची या पुरस्कारासाठी निवड झाली असल्याचे कै. माणिकराव पाटील एज्युकेशन फाऊंडेशनच्या सचिव धनश्री तुषार पाटील यांनी सांगितले आहे. तसेच, या फाऊंडेशनच्यावतीने समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा शनिवारी (दि.२८) कोल्हापूर येथील रा. शाहू मेमोरियल ट्रस्ट येथे पार पडणार आहे.

## प्राची ठाकूर यांना निरोप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गोंधळपाडा शाळेच्या मुख्याध्यापिका प्राची ठाकूर यांना केंद्रप्रमुख म्हणून पदोन्नती मिळाल्याने त्यांना गोंधळपाडा शाळा व व्यवस्थापन समितीच्यावतीने निरोप देण्यात आला. हा कार्यक्रम मंगळवारी (दि.२४) पार पडला. या निरोप समारंभासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, शाळेतील शिक्षक, वेश्वीतील प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्राची ठाकूर यांना गणेश प्रतिमा देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी, पालक तसेच शिक्षक, व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वारगे यांनी, तर दिपक पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कविता गायकवाड यांनी विशेष प्रयत्न केले. रश्मी राऊत यांनी मनोगत व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता केली.



# एसटीची गाडी धावेल?

एसटी डेपोंच्या जागांमध्ये व्यापारी संकुले बांधण्याचा प्रस्ताव पुन्हा पुढे आला आहे. राज्य मंत्रिमंडळाने ३९ आगारांच्या जागा खासगीकरणातून विकसित करण्याचे ठरवले आहे. सध्या रुटूखुटू चाललेली एसटी जरा जोरात धावण्यासाठी अशा पेट्रोलची गरज आहेच. २००१ मध्ये विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना पहिल्यांदा निर्णय घेतला होता. पण तो फार पुढे गेला नाही. २०१७ मध्ये दिवाकर रावते परिवहनमंत्री असताना तेरा आगारांच्या जागांचा विकास करण्याचे धोरण जाहीर केले होते. पण त्यातूनही फार काही हाती लागले नव्हते. वास्तविक राज्यभरामध्ये एसटी महामंडळाकडे गावे व शहरांमध्ये अत्यंत मोक्याच्या ठिकाणी मोठ्या जागा आहेत. छोट्या तालुक्यांचा व गावांचा विकास तर एसटी स्टँडच्या आजूबाजूनेच अधिक होत गेलेला दिसतो. म्हणजेच एसटी डेपोमध्ये जर दुकाने, मॉल्स किंवा खासगी कार्यालये यांच्यासाठी जागा उपलब्ध करून दिल्या तर लोकांच्या त्यांच्यावर उड्या पडायला हव्यात. पण अनेक कारणांमुळे तसे होत नाही. बस स्टँड ही सार्वजनिक जागा असल्याने तेथे चोवीस तास सर्व प्रकारच्या लोकांचा वावर असतो. सुरक्षिततेच्या दृष्टीने खासगी लोकांना हे सोईस्कर वाटत नाही. भयंकर अस्वच्छता आणि गजबज हीदेखील अडचणीची असते. याखेरीज काही अन्य तांत्रिक कारणेही असावीत. मात्र या जागांचा पुरेसा उपयोग महामंडळाला करता आलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. एसटी महामंडळाचे सुमारे साडेसातशे आगार व बसस्टँड आहेत. यातील किमान दोनशे आगार तरी भरपूर जागा असलेले व मोक्याच्या ठिकाणी आहेत. खरे तर सरकारने या सर्वांचा विकास करण्याचे एकत्रित धोरण राबवायला हवे. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे हा आपल्या सरकारच्याच अभियंत्यांनी बांधला व त्यात हजारो कोटींची बचत केली. नितीन गडकरींनी त्यासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापले. मुंबईच्या विकासासाठी एमएमआरडीए असेच काम करते. बांद्रा-कुर्ला संकुलातील भूखंडांचा विकास करून त्याने प्रचंड निधी कमावला व वापरला. त्याच धर्तीवर खरे तर सरकारने एसटीच्या जागांच्या विकासासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापायला हवे.

### सरकारचे नियंत्रण नको

हे मंडळ राज्यभरासाठी एकत्रित निर्णय घेऊ शकेल. सरकारी बँका किंवा एलआयसीसारख्या संस्था यांना मोक्याच्या ठिकाणी कार्यालये थाटायची असतात. खासगी मालकांना या बँका अवाच्या सवा भाडे देतातच. हे हुकुमी भाडेकरू आपल्याकडे वळवण्यासाठी एसटीला सहज प्रयत्न करता येणे शक्य होईल. मात्र दर काही वर्षांनी दहा-बारा आगारांचा विकास करणार अशा घोषणा करून फारसे काहीच पदरात पडत नाही. आजवर ४५ आगारांच्या केलेल्या विकासावर खर्च २२ कोटींचा आणि उत्पन्न ३२ कोटी असा प्रकार आहे. अदानी किंवा अंबानीसारखे उद्योजक अशा जागांमधून शेकडो कोटींचे उत्पन्न निर्माण करू शकतील. तेच सरकारला का जमू नये असा प्रश्न आहे. आता नव्या धोरणात भाडेपट्टा किंवा लीजचा कालावधी पूर्वीच्या तीसऐवजी साठ वर्षे केला जाणार आहे. शिवाय आगाराचा विकास करताना मिळणारा केवळ अर्धा टक्के एफएसआय किंवा चटई क्षेत्रफळ महामंडळाला तर बाकीचा विकासकाला मिळणार आहे. याचाच अर्थ यात विकासकाला भरपूर फायदा होणार आहे. शिवाय आता हे सर्व प्रस्ताव महामंडळाच्या पातळीवरच अंतिम संमत होणार आहेत. राज्य सरकारकडे नेण्याची गरज भासणार नाही. हा चांगला निर्णय आहे. एसटीवरचे सरकारी नियंत्रण हा एक अजब प्रकार आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी सातवा वेतन आयोग लागू करा अशी मागणी केली की एसटी हे एक स्वतंत्र महामंडळ आहे असे सरकार बजावत असते. पण दुसरीकडे एसटीची सर्व सूत्रे सरकारच्या ताब्यातच असतात. एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक हे सनदी अधिकारी असतात आणि ते परिवहन मंत्र्यांना बांधील असतात. मंत्रालयातील परिवहन खात्यातून त्यांच्यावर नियंत्रण ठेवले जाते. एसटीतील नेमणुका, वेतनवाढी, खरेद्या याबाबतही मंत्रालयाचाच अंकुश असतो. मात्र इतके करूनही कर्मचाऱ्यांचे पगार करायला महामंडळाला सतत तोंड वेंगाडावे लागते. मंत्र्यासंत्र्यांना टोलमाफी मिळते. पण सामान्य लोकांच्या एसटीला मिळत नाही. अलिकडे शिंदे सरकारने घोषणा करूनही कोकणात जाणाऱ्या एसटीच्या विशेष गाड्या टोलनाक्यांवर ठेकेदारांनी टोलसाठी तासभर रोखून ठेवल्या होत्या.

### नाराज गोगावलेंना संधी

थोडक्यात गरीब एसटीवाल्यांना कोणी वाली नाही. म्हणूनच एसटी महामंडळाचे अध्यक्षपद भरतशेट गोगावलेंना नको आहे. ती त्यांना ओसाडगावची पाटीलकी वाटते आहे. खरे तर त्यांच्याच शिंदे सरकारने आणलेली ही खासगीकरणाची नवी योजना पारदर्शकपणे आणि धडाडीने राबवली तर जनता त्यांनाच दुवा देईल. एसटी बस सेवा हा कोकणाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आता दुचाकींचा सुळसुळाट झाला असला आणि टमटम रिक्षावाल्यांनी मुसंडी मारली असली तरीही अजून लोकांची एसटीला पसंती कायम आहे. खरे तर मागणी पुरवण्यात एसटी कमी पडू लागल्यानेच लोक इतर साधनांकडे वळू लागले. गेल्या काही वर्षांमध्ये एसटीची पार वाट लागली आहे. गाड्यांची अवस्था भीषण आहे. कोरोनामध्ये अनेक सेवा बंद झाल्या त्या नंतर सुरूच झालेल्या नाहीत. मुंबईतून पूर्वी कोकणातल्या प्रत्येक महत्वाच्या गावांना थेट सेवा होती. आता त्यातल्या निम्म्या सेवाही सुरु नाहीत. शिवशाहीसारख्या सेवांसाठी कंत्राटी भरती करण्यात आली आहे. त्या चालक व वाहकांना जेमतेम आठ दहा हजार रुपये मिळतात. त्यांच्याकडे पाहून एसटी सेवेतील कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मागण्याचीही लाज वाटावी अशी स्थिती आहे. आठ हजार कोटींचा संचित तोटा आहे. हे चित्र बदलण्यासाठी तडफदार नेतृत्वाची गरज आहे. शेजारच्या कर्नाटक राज्याची परिवहन सेवा फायद्यात आहे. खासगी सेवेच्या तोंडात मारतील अशा त्यांच्या बसेस आहेत. ते जर हे करू शकतात तर महाराष्ट्राला ते का जमू नये हा प्रश्न आहे. अडचण अशी आहे की, राजकारणी आणि नोकरशहा कधीच एसटीने प्रवास करीत नाहीत. त्यामुळे ते ठेकेदारांचे आणि खासगी मालकांचे भले करण्याचा आणि त्यातून आपले कमिशन काढून घेण्याचा विचार करतात. गोगावले व त्यांच्यासोबतच्या अधिकाऱ्यांनी जनतेच्या बाजूने विचार केला तर हे चित्र बदलू शकेल.

---

विचार

# मंदीची अमेरिकेत चाहूल: भारताचं काय?

***जर्मनीची अर्थव्यवस्था सध्या सुस्तावली आहे. जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेली अमेरिका मंदीचे संकेत देत आहे. चीनदेखील अनेक आर्थिक आघाड्यांवर संघर्ष करत आहे तर जपानही मंदीच्या गर्तेत अडकला आहे. कोरोनाच्या तीव्र परिणामांमधून बाहेर पडलेल्या भारतात मात्र सध्या आर्थिक तेजी दिसू लागली आहे. अशा परिस्थितीत या आर्थिक मंदीचे पडसाद भारतात उमटणार का, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा केलेला प्रयत्न.***



**मेधा इनामदार**

सध्या अमेरिका मोठ्या राजकीय बदलांच्या उंबरठ्यावर उभी आहे. ज्यो बायडेन यांचा कार्यकाळ संपत आला असून कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात होणारी थेट लढत अमेरिकेचे भविष्य ठरवणार आहे. अर्थात अमेरिकेच्या अध्यक्षांचे स्थान या दोघांपैकी कुणीही भूषवले तरी त्यांची पुढची वाटचाल मात्र कठीण असणार आहे. या सर्वोच्च पदाचा भार ग्रहण करणाऱ्या नेत्याला सर्वात प्रथम तोंड द्यावे लागणार आहे ते देशाला ग्रासून टाकणाऱ्या आर्थिक मंदीला. तसे पाहता अलिकडे जागतिक बाजाराला थोडी झळाळी आल्यासारखे वाटू लागले होते. कोरोनाच्या परिणामांमधून जग नुकते सावरू लागले होते. आयात-निर्यातीचे प्रमाण वाढू लागले होते. मरगळलेल्या उद्योगांनी पुन्हा नव्याने जीव धरला होता. रोजगाराच्या संधी वाढत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. परंतु अचानक पुन्हा एकदा मंदीचे काळे ढग दाटून आले आहेत. २७.९७४ ट्रिलीयन डॉलर्सच्या जगातल्या सगळ्यात मोठ्या अमेरिकन अर्थव्यवस्थेने तसे संकेत दिले आहेत. अमेरिकेतील अनेक मोठे आर्थिक निर्देशांक कमजोरीची चिन्हे दर्शवत आहेत. बेरोजगारीचे आकडे जानेवारीपासून लक्षणीयरीत्या वाढले. जुलैमध्ये बेरोजगारीचा दर ४.३ टक्क्यांपर्यंत वाढला, जो गेल्या तीन वर्षांमधील सर्वोच्च दर आहे. त्याच वेळी, आयएसएम मॅन्युफॅक्चरिंग पीएमआय हा नऊ महिन्यांच्या नीचांकी पातळीवर घसरला. पीएमआय म्हणजे पर्चेसिंग मॅनेजर्स इंडेक्स, हा आर्थिक निर्देशांक सेवा आणि उत्पादन या दोन्ही क्षेत्रातील कल दर्शवतो. अमेरिकेच्या शेअर बाजारात दिसून येणारी पडझडदेखील या आर्थिक संकटाकडे निर्देश करते.

गेल्या दोन महिन्यांमध्ये अमेरिकेतील उत्पादन क्षेत्रात १९ वेळा घसरण झाली असून असे घडण्याचा महामंदीनंतरचा हा सर्वात मोठा कालावधी आहे. यापूर्वी सेवा आणि उत्पादन निर्देशांक केवळ मंदीच्या काळातच घसरले आहेत. यावरून अमेरिकेची अर्थव्यवस्था झपाट्याने उतरणीकडे येऊ लागली आहे, हे स्पष्ट होते. सरकारचा खर्च मे महिन्यात ६.५ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला आणि बजेट तूट जीडीपीच्या ६.५ टक्के होती. यापूर्वी केवळ मोठ्या आर्थिक संकटांमध्येच असे घडले आहे. आर्थिक तज्ज्ञ आणि विश्लेषकांच्या मते लवकरच येऊ घातलेल्या मंदीचेच हे लक्षण आहे. त्याच वेळी अमेरिकेवरील कर्जाचा भारही विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. एप्रिल २०२४ च्या आकडेवारीप्रमाणे फेडरल सरकारचे कर्ज ३४.६ अब्ज डॉलर्सवर पोहोचले आहे. ही रक्कम देशाच्या जीडीपीच्या १२५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. विशेष म्हणजे गेल्या चार वर्षांमध्ये देशाचे कर्ज ४७ टक्क्यांनी म्हणजे सुमारे ११ ट्रिलियन डॉलर्सनी वाढले आहे. याचाच अर्थ अमेरिकेतील प्रत्येक करदात्यावर सुमारे २,६७,००० डॉलर्स म्हणजेच सुमारे २,२१,७५,७७८ रुपयांचे कर्ज आहे. ही गती कायम राहिली तर २०२५ पर्यंत अमेरिकेचे कर्ज ४० ट्रिलियन रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. फेडरल रिझर्व्हने व्याजदरात कपात न केल्यास अमेरिकेला या कर्जावरील व्याजापोटी वार्षिक १.६ ट्रिलियन डॉलर्स द्यावे लागतील. व्याजाची ही रक्कम देशाच्या संरक्षण बजेट आणि हेल्थकेअर खर्चापेक्षाही जास्त असेल.

अर्थव्यवस्थेचा आकार जीडीपीवरून मोजला जातो. जीडीपी म्हणजे ग्रोस डॉमेस्टिक प्रोडक्ट. बाजारात उत्पादन कमी झाल्याने देशाचा जीडीपी कमी होतो. देशात सलग सहा महिने जीडीपी कमी होत गेल्यास अर्थशास्त्रात आर्थिक मंदी आली असे म्हटले जाते. गेल्या आठ महिन्यांमध्ये तेथील ४५२ बलाढ्य कंपन्यांनी दिवाळखोरी घोषित केली आहे. या वर्षी ऑगस्टमध्ये ६३ मोठ्या कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केली तर जुलैमध्ये त्यांची संख्या ४९ होती. गूगल, ॲमेझॉन यांच्यासारख्या मोठमोठ्या कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर कपात केली आहे. अनेक कंपन्यांच्या बाजारमूल्यात मोठी घसरण झाल्याचे आढळून आले आहे. एआयमुळे तेजीत आलेला शेअर बाजार ब्रॉडकॉम, एनव्हीडिया आणि इतर टेक कंपन्यांमुळे खाली आला आहे. ट्रेझरी उत्पन्नही कमी झालेले आहे. मधल्या काळात थोड्याफार प्रमाणात ते रिकव्हर झाले होते, पण आता त्यात पुन्हा घसरण झाली आहे. उतरत असलेला आर्थिक निर्देशांक, वाढती बेरोजगारी, बाजारमूल्यात झालेली घसरण आणि ग्राहकांची कमी झालेली क्रयशक्ती या सर्व बाबी अमेरिका मंदीच्या दिशेने ओढली जात असल्याचे स्पष्ट करत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये झालेली युद्धे, त्यातील अमेरिकेचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग आणि त्याचा तिजोरीवर पडणारा भार हे या आर्थिक अस्वस्थतेचे एक प्रमुख कारण आहे. व्याजदराचा वाढता आलेख आणि त्यात कपात करण्यासाठी सरकारने चालवलेली चालढकल यामुळे आर्थिक अस्थिरतेला चालना मिळत आहे.

आज खुल्या अर्थव्यवस्थेमुळे सर्वच देश आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी जोडले गेले असल्यामुळे अमेरिकन अर्थव्यवस्था मंदीच्या जाळ्यात अडकल्यास जगभरातील देशांवर परिणाम दिसून येईल. अर्थातच भारतही याला अपवाद ठरणार नाही. अमेरिकन मार्केटमध्ये तेजी असल्यास भारतीय मार्केटमध्येही तसेच सकारात्मक परिणाम उमटतात. त्यामुळे अमेरिकेतली मंदी भारतातही येणार हे सांगायला कुणा ज्योतिषाची गरज नाही. परंतु भारतावर या मंदीचा मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष परिणाम होण्याची शक्यता कमी आहे, असे अर्थतज्ज्ञांचे म्हणणे आहे. कारण भारताचे स्वत:चे सुमारे १४० कोटी जनतेचे मार्केट फार मोठे आहे. त्यामुळे मंदी आलीच तर फरक पडेल तो आयात आणि निर्यातव्यापारात. मंदी येते तेव्हा सहसा ग्राहकांचा खर्च कमी होतो. त्यामुळे भारतीय निर्यातीची मागणी कमी होऊ शकते. तसेच अमेरिकन मार्केटवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असणाऱ्या आयटी, फार्मास्युटिकल्स आणि टेक्सटाईल यासारख्या क्षेत्रांमध्ये ऑर्डर कमी होतील. त्याचा परिणाम भारतीय आयटीक्षेत्रावर होऊन इथल्या आयटी कंपन्यांमध्ये रोजगाराचे प्रमाण कमी होऊ शकते. एकूणच जागतिक पुरवठा साखळीत व्यत्यय येईल. आर्थिक मंदीत ही साखळी तुटते. अशा परिस्थितीत अमेरिकन बाजारांवर अवलंबून असणाऱ्या भारतीय निर्यातदारांसाठी ही आव्हानात्मक परिस्थिती ठरू शकते.

अमेरिकेतील मंदीमुळे जागतिक पातळीवर गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होऊ शकतो. त्यामुळे भारतात परकीय गुंतवणुकीचा ओघ कमी होऊ शकतो. अर्थातच विकासासाठी परकीय गुंतवणुकीवर अवलंबून असलेल्या क्षेत्रांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते. याव्यतिरिक्त चलनातील चढ-उतार, विशेषत: अमेरिकन डॉलरच्या मूल्यातील संभाव्य घसरणीचा भारतीय चलनावर नकारात्मक परिणाम होण्याची भीती आहे. असे झाल्यास आयात महाग होईल आणि बाहेरून येणाऱ्या मालावर अवलंबून असणाऱ्या व्यवसायांवर परिणाम होईल. भारतात कोविडमुळे २०२१ आणि २०२२ या दोन वर्षांमध्ये अर्थव्यवस्था, उत्पादन व्यवस्था आणि रोजगारवृद्धी जवळपास नकारात्मकच होती. परंतु २०२२-२३ पासून शासकीय प्रोत्साहनामुळे अर्थव्यवस्था पुन्हा कार्यान्वित झाली. त्या वर्षी ५.७ टक्के रोजगारवाढ झाली आणि देशात अर्थव्यवस्थेविषयी एक आनंदाची लहर निर्माण झाली. पण आता ऑगस्ट २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात कंपन्यांचे २०२३-२४ या वित्तीय वर्षाचे आर्थिक ताळेबंद उपलब्ध झाले आहेत. ते पाहता लक्षात येते की शासकीय प्रोत्साहन बंद झाल्यानंतर मोठ्या कंपन्यांनी वर्षभरात सुमारे ५२ हजार कर्मचाऱ्यांची कपात केली आणि रोजगारवाढीचा दर १.५ टक्क्यांपर्यंत घसरला. त्याचा अर्थ असा की २०२३-२४ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची गती काही प्रमाणात मंदावली आहे. उत्पादनवृद्धी, श्रमिकांची उत्पन्नवृद्धी आणि रोजगारवृद्धी या सर्वच घटकांच्या वाढीची गती मंद झाली आहे.

नवनवीन तंत्रज्ञानामुळे अमेरिका, चीन, ब्रिटन, भारत यासारख्या महत्त्वाच्या देशांमध्ये स्वयंचलित यंत्रांद्वारे श्रमिकाला कामाला न लावताही वस्तूंचे उत्पादन वाढू शकते, ही बाब सिद्ध झाली आहे. त्यामुळे मनुष्यबळाचा खर्च वाचून उत्पादन वाढू शकते. परंतु उत्पादन वाढले तरी त्या प्रमाणात रोजगार वाढला नाही, तर त्या वस्तूसाठी मागणी कोण करणार? म्हणजेच वाढत्या बेरोजगारीमुळे मंदी निर्माण होईल आणि मंदीमुळे पुन्हा बेरोजगारीचे विषारी चक्र निर्माण होईल. त्यातून निर्माण होणारी अनिश्चितता आणि अस्थिरता आता बाजारात दिसून येऊ लागली आहे. त्यातच लोकप्रियता मिळवण्यासाठी जाहीर केलेल्या अनेक योजनांचा भर सरकारी तिजोरीवर पडतो आहे. अर्थातच भारतालाही मंदीच्या संकटाला तोंड द्यावे लागू शकते.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या काही अभ्यासकांच्या म्हणण्याप्रमाणे या वेळी अमेरिका मंदीत गेली तर भारतावर फारसा परिणाम होणार नाही. गेल्या काही वर्षांमध्ये भारत सरकारने बदललेल्या आर्थिक धोरणाचा हा परिणाम आहे. सरकारच्या सूचनेनुसार २०१५ पासून रिझर्व्ह बँकेने केवळ महागाईवर लक्ष केंद्रित केले आहे. दुसरे, पंतप्रधानांनी धोरणाद्वारे भारतात प्रथमच सेवानिवृत्ती निधी, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना आणि भविष्य निर्वाह निधी यांना इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्याची परवानगी दिली आहे. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे कॉर्पोरेट नफ्याकडे वळणे. हा बदल सप्टेंबर २०१९ मध्ये झाला. कॉर्पोरेट करात मोठ्या प्रमाणात कपात करून सरकारने जीडीपी सुधारण्यासाठी कॉर्पोरेट नफ्याला एक व्यासपीठ दिले. अमेरिकादेखील आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी पावले उचलत आहे. आपणही समोर दिसणाऱ्या संकटांकडे दुर्लक्ष न करता आधीच सावध राहून उपाय योजल्यास प्रगतीची वाट सुकर होईल, यात शंका नाही.

---

आजकाल

# त्यांच्या वस्तू आणि गरिबांकडचा पैसा

**संजीव चांदोरकर**

किसान सन्मान, लाडकी बहीण, लाडका भाऊ, वयस्कर लोकांसाठी कॅश, मुलींच्या शिक्षणासाठी कॅश .अशा योजनांतून लाभार्थ्यांच्या बँक अकाउंट मध्ये कॅश ट्रान्सफर केली जाते. हि यादी मोठी आहे. या यादीत भर पडणार आहे.

या वरकरणी सुट्या सुट्या योजना वाटतील. पण हे सगळे युनिव्हर्सल बेसिक इन्कम कडे चालले आहे.

या सगळ्या योजनांच्या संकल्पनांची मुळे गरिबी दारिद्र्याच्या व्याख्येत आहेत.

''गरीब तो ज्याच्याकडे जगण्यासाठी लागणारे पैसे कमी पडतात''

मग त्यावर उपाय काय? गुंतागुंतीच्या प्रश्नाचे सोपे विश्लेषण सोपे उत्तर : गरिबांच्या हातात कॅश द्या !

जे सुरु आहे त्याचे सरळ साधे वर्णन हेच असू शकते.

गरीबीतून येणाऱ्या यातना/ वेदना एवढ्या ठूसठुसत असतात की कोणी त्यावर बाम लावतो, बँड एड लावतो म्हणाले तरी वेदनेत असणारी ती व्यक्ती त्याला नाही म्हणणार नाही. जरी त्या व्यक्तीला माहीत असले की बाम किंवा बँड एड हा त्यावरचा दीर्घकालीन उपाय नाही तरी देखील.

त्यामुळे लाभ घेण्यासाठी रांगा लावणाऱ्या लाभार्थ्यांना दोष देता येणार नाही. मी त्याच अवस्थेत असेन तर तेच करेन. निःसंदेह तेच करेन

लाभार्थ्यांचे जाऊद्या. पण कायदे करणारे, आर्थिक धोरणे, अर्थसंकल्प बनवणारे, जागतिक देशाच्या अर्थव्यवस्थांचा आयुष्यभर अभ्यास करणारे, त्यांचे काय ?

माणसाची / मानवी जीवनाची/ मानवी दुःखाची व्याख्या व्यापक केली की कळेल कि वंचित अवस्था फक्त पैशाची नसते, ती अक्षरशः नाना प्रकारची असते. त्यात अनेक गोष्टी अशा आहेत ज्याचे मूल्यांकन रुपयात काढता देखील येणारे नाही.

मूळ मुद्दा काय आहे ?

देशाच्या, जगात सर्वात जास्त असणाऱ्या, लोकसंख्येकडे वस्तुमाल/सेवांचे फक्त एक मार्केट म्हणून बघायचे; गरिबांना देशाच्या गळ्यातील नको असलेले लोढणे म्हणून बघायचे की त्या देशाकडे, ज्यात अर्धी लोकसंख्या तरुण आहेत, ज्यांच्या सर्व प्रकारच्या क्षमता, शारीरिकच नाहीत तर उद्योजकता, संशोधन करण्याच्या, शिकण्याच्या/कला/कौशल्ये/क्रीडा यातील क्षमता वापरल्याच जात नसल्यामुळे वापरण्यासाठी एक अंगण म्हणून बघायचे ?

तुम्हाला असे वाटेल की कॅश ट्रान्सफर मागे फक्त गरिबांचा पुळका आहे. तर तसे देखील नाहीये.

हजारो कोटींच्या कॅश ट्रान्सफरमुळे लोकांची क्रयशक्ती कृत्रिम पणे वाढते. त्यामुळे वस्तूमाल बनवणाऱ्या कॉर्पोरेटना गुदगुल्या होतच नसतील असे थोडेच आहे?

असे असेल तर कॅश ट्रान्सफर हा कॉर्पोरेट क्षेत्राचा देखील अजेंडा असू शकतो.

त्यांना माहीत आहे, त्यांची व्यवस्था क्रायसिस मध्ये आहे. हा क्रायसिस काही किमान संरचनात्मक बदल केले तर अंशतः सोडवला जाऊ शकतो. ज्याला त्यांची तयारी नाही. कारण त्यांच्या हितसंबंधांना छेद जाईल म्हणून.

या विविध कॅश ट्रान्स्फर योजनांमधून कॉर्पोरेट वित्त भांडवलशाहीचे/ प्रस्थापित व्यवस्थेचे टेस्टिंग सुरू आहे.

हवेत गवताच्या काड्या / फुगे सोडून पाहिले जात आहेत. लोकांना अकाउंट मध्ये कॅश येण्याचे व्यसन लावले जात आहे. ही गाडी ''युनिव्हर्सल बेसिक इन्कम'' कडे चालली आहे हे नक्की. भारतातच नाही. अनेक देशात.

यूबीआय मधून व्यवस्थेचे तांबडतोबीच्या प्रश्नांची धार कमी झाली असे वाटेल. असंतोषाची धार कमी झाली असे वाटेल. पण देशासाठी/ समाजासाठी/विशेषतः तरुणांसाठी हे चांगले नसेल हे नक्की.

भारताला शेती केंद्री, रोजगार केंद्री, स्वयं रोजगार केंद्री आर्थिक मॉडेल शिवाय पर्याय नाही.

तुम्हाला युटोपियन वाटणे साहजिक आहे. पण तुमची मुले, नातवंडेच या राजकिय मागण्या करणार आहेत. कारण देश एकसंघ ठेवण्यासाठी मॉडेल्स राबवावी लागतील.

---

लोकसंसद

## फूड पॅकेजिंगमुळे मानवी शरीरास धोका

फूड पॅकेजिंगमुळे मानवी शरीरात ३६०० केमिकल गेली असल्याचे नवे संशोधन समोर आले आहे. हे संशोधन धक्कादायक आहे. छपाईचा कागद, प्लास्टिक आणि थर्माकॉलच्या माध्यमातून हे केमिकल मानवी शरीरात जाते असे या संशोधनातून समोर आले आहे. भारतासाठी तर हे संशोधन धक्कादायक असेच आहे कारण भारतात फूड पॅकिंग करण्यासाठी वर्तमान पत्राचा कागद आणि प्लास्टिक यांचा सर्रासपणे वापर केला जातो. वर्तमान पत्रासारख्या छपाईच्या कागदाची शाई अन्न पदार्थात उतरत असल्याने वर्तमान पत्रासरख्या छपाईच्या कागदात अन्न पदार्थ विकण्यास सरकारने काही वर्षापूर्वी बंदी घातली होती मात्र ही बंदी केवळ कागदावरच आहे. अन्न पदार्थ विक्रेते आजही वर्तमान पत्राच्या



कागदात अन्न पदार्थ बांधून विकतात. काही अन्न पदार्थ विक्रेते प्लास्टिकच्या पाकिटात अन्न पदार्थ विकतात. प्लास्टिकच्या पाकिटातील अन्न पदार्थ सेवणास घातक असतात. त्यातही गरम स्वरूपातील पदार्थ असेल तर ते जीवघेणं ठरू शकतात हे यापूर्वीही अनेक संशोधनातून सिद्ध झाले आहे. विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमातील प्रसाद, जेवणासाठी ही थर्माकॉलची ताटे, ग्लास, कप वापरण्यात येतात. थर्माकॉल देखील मानवी शरीरास घातक आहे तरीही त्याचा सर्रासपणे वापर होतो. सरकारनेच यावर आता कायदेशीर बंदी आणली पाहिजे. केवळ बंदी आणली म्हणजे सरकारची जबाबदारी संपली असे नाही तर सरकारने या बंदीची प्राभवी अंमलबावणी करायला हवी. जो अन्न विक्रेता वर्तमानपत्राचा कागदात किंवा प्लास्टिक मध्ये अन्न पदार्थ विकेल त्याच्यावर सरकारने कायदेशीर कारवाई करायला हवी. नागरिकांनीही प्लास्टिक किंवा वर्तमान पत्राचा कागदात अन्न पदार्थ स्वीकारू नयेत.

**- श्याम ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे

---

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२६ सप्टेंबर**

**१९२० :-** संस्कृतचे अभ्यासक, संतसाहित्यिक, आयुर्वेदाचे जाणकार, कवी, कीर्तनकार अनंत दामोदर आठवले यांचा जन्म. आपले गुरु दासगणू महाराजांचे समग्र वाङ्मय त्यांनी ११ खंडांत संपादित केले. 'महाभारताचे वास्तव दर्शन' यातून त्यांच्या महाभारताच्या अभ्यासाची व्यासंगता लक्षात येते. याशिवाय 'व्याधिविनिश्चय' हा वैद्यक शास्त्रावरचा पाठयग्रंथ तर 'श्रीकृष्णकथामृत' हे १८ सर्गाचे कृष्णाच्या जीवनावरचे महाकाव्ये त्यांच्या कवित्वशक्तींच्या आविष्काराचे सामर्थ्य पटविणारे आहे. **१९३० :-** लेखक प्राचार्य डॉ. भगवान बापट यांचा जन्म. कार्ल मार्क्स, जे कृष्णमूर्ती, विनोबा भावे, बाबा आमटे आदींची चरित्रे त्यांनी लिहिली. **१९३६ :-** महाराष्ट्राच्या वनखात्यात मुख्य वनरक्षक म्हणून सेवा करणारे आणि या विषयावरील एक लेखक डॉ. आनंद मसलेकर यांचा जन्म. महाराष्ट्र शासनाने त्यांचे 'वन व्यवस्थापन' हे पुस्तक प्रसिध्द केले तसेच वनसेवेच्या अनुभवावर 'जंगलाची वाट' हे आत्मवृत्त, २० कथा तसेच 'अभिजात' या दिवाळी अंकातून तांत्रिक विषयक लेख. विश्वकोशाच्या १८ व्या खंडातून 'रिमोट सेन्सिंग' या विषयावर लेखन आणि काही इंग्रजी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३९ :-** लेखक आणि नाटय-चित्रपटांचे समीक्षक दिवाकर दत्तात्रय गंधे यांचा जन्म. यांचा 'पारिजात' हा कथासंग्रह आणि 'शतऋतू' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. **१९५२ :-** सूचीकार, चरित्रकार सदाशिवशास्त्री कान्हेरे यांचे निधन. 'कॅटलॉग ऑफ द मराठी मॅन्युस्क्रिप्ट्स् इन द इंडिया ऑफिस लायब्ररी' अशी मराठी हस्तलिखितांची एक सूची तसेच 'अभिजात' या दिवाळी अंकातून तांत्रिक विषयक लेख. विश्वकोशाच्या १८ व्या खंडातून 'रिमोट सेन्सिंग' या विषयावर लेखन आणि काही इंग्रजी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३९ :-** लेखक आणि नाट्य चित्रपटांचे समीक्षक दिवाकर दत्तात्रय गंधे यांचा जन्म. यांचा 'पारिजात' हा कथासंग्रह आणि 'शतऋतू' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. **१९५२ :-** सूचीकार, चरित्रकार सदाशिवशास्त्री कान्हेरे यांचे निधन. 'कॅटलॉग ऑफ द मराठी मॅन्युस्क्रिप्ट्स् इन द इंडिया ऑफिस लायब्ररी' अशी मराठी हस्तलिखितांची एक सूची त्यांनी तयार केली. **१९८५ :-** गणित विषय घेऊन एम.ए होणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या पहिल्या विद्यार्थिनी, शिक्षणतज्ञ, साहित्यिक यमुनाबाई हिर्लेकर, पूर्वाश्रमीच्या यमुना सदाशिव भाटे यांचे निधन. १९२७च्या सुमारास शिक्षणशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी जर्मनी व इंग्लंडला प्रयाण. तेथील शिक्षणपध्दतीवर 'किंडरगार्टन इन जर्मनी', 'व्होकेशनल एज्युकेशन इन जर्मनी' या सारखी पुस्तके लिहिली. तसेच गीतेच्या समश्लोकी अनुवादाबरोबर नव्या जगात, विचारधारा, आजीव शिक्षण' ही वैचारिक व शिक्षणविषयक पुस्तके लिहिली. **१९९६:-** पत्रकार, नाटककार, संपादक विद्याधर गोखले यांचे निधन. त्यांनी 'रंगशारदा' ही संगीत नाटकांना प्राधान्य देणारी नाट्यसंस्था सुरु केली. संगीत 'सुवर्णतुला', 'पंडीतराज जगन्नाथ', 'मंदारमाला', 'जावयाचे बंड', 'चमकला ध्रुवाचा तारा', 'जय जय गौरीशंकर', 'साक्षीदार', 'बावनखणी', 'अमृत झाले जहराचे', 'मदनाची मंजिरी', 'स्वरसम्राज्ञी' ही नाटके आणि मराठी, हिंदी, उर्दू, फारसी, संस्कृत कवींच्या कथा सांगणारे 'कविकथा' आणि गजलसम्राट गालिब, शायरेआजम गालिब शायरीचा शालिमार' ही गालिब यांचे चरित्र व काव्य याविषयीची पुस्तके.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

# ई-रिक्षांची संख्या वाढवण्याची गरज

**। माथेरान । वार्ताहर ।**

**शहरात २० ई-रिक्षा वर्षभरासाठी प्रायोगिक तत्वावर सुरू आहेत. मात्र, पावसाळी पर्यटनात झालेली वाढ लक्षात घेता आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी ई-रिक्षा सेवा देणे बंधनकारक असल्याने माथेरान शहरात सुरू असलेल्या २० ई-रिक्षा अपुऱ्या पडत आहेत. याकरिता याठिकाणी ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करण्याची अत्यंत गरज असल्याचे स्थानिक नागरिकांमधून बोलले जात आहे.**

थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी प्रायोगिक तत्त्वावर प्रदूषणमुक्त बॅटरीवर चालणाऱ्या ई-रिक्षा सुरू झाल्या आहेत. ई-रिक्षांमुळे शाळेत दूरवर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, दिव्यांग बांधवांना, वयोवृध्द पर्यटकांना येथे माथेरान शहरात दाखल होणे सोईस्कर झाले आहे. या ई-रिक्षा सुरू झाल्यापासून पर्यटकांच्या संख्येत कमालीची वाढ झालेली येथे दिसत आहे. यंदा पावसाळ्यात सुद्धा दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक या पर्यटनस्थळी दाखल झाले होते. यामुळे येथील व्यवसायात आणि पालिकेच्या तिजोरीत




## पर्यटन वाढल्याचा परिणाम

चांगलीच भर पडलेली दिसून येते. माथेरानमधील वाढते पर्यटन पाहता येथे सुरू असलेल्या २० ई-रिक्षा स्थानिकांना आणि पर्यटकांना सेवा देण्यास अपुऱ्या पडताना दिसत आहेत. याठिकाणी ई-रिक्षा करिता तासनतास पर्यटक रांगेत उभे असल्याचे चित्र अनेकदा पहावयास मिळते. त्याचबरोबर येथे स्थानिकांना देखील ई-रिक्षासाठी बराच वेळ वाट पहावी लागते. विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी सकाळी साडेसहा वाजल्यापासून ई-रिक्षा सुरू होतात. त्यानंतर दुपारी एक वाजेपर्यंत येथे ई-रिक्षाची बॅटरी डिस्चार्ज होऊन ई-रिक्षा पुन्हा साडे तीन ते चार तास चार्जिंगसाठी बंद कराव्या लागतात. मग अशावेळी फक्त तीन ते चार ई-रिक्षा नागरिकांना आणि पर्यटकांना येथे सेवा पुरवीत असतात. त्यामुळे अनेकवेळा गोंधळाची परिस्थिती निर्माण होत असते. यावर ई-रिक्षांची संख्या वाढवणे गरजेचे आहे.

> **सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माथेरान पर्यटनस्थळी प्रयोगिक तत्वावर ई-रिक्षा सुरू झाल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सनियंत्रण समितीला ई-रिक्षांची संख्या निश्चित करण्याचा अधिकार दिलेला आहे. संघटनेच्यावतीने ई-रिक्षांची संख्या वाढवण्याची सातत्याने मागणी करीत आहोत. स्थानिकांनी देखील ई-रिक्षांची संख्या वाढावी यासाठी मागणी केल्यास सनियंत्रण समितीला सुद्धा याची दखल घ्यावी लागेल. सर्वांच्या प्रेयत्नाने हा प्रश्न मार्गी लागू शकतो.**
> **-सुनिल शिंदे, सचिव, रिक्षा संघटना**

> **माथेरान शहरात सध्या वीस ई-रिक्षा सुरू आहेत. त्यापैकी पंधरा ई-रिक्षा शालेय विद्यार्थ्यांना सेवा देत असतात आणि फक्त पाच ई-रिक्षा येथे नागरिकांना आणि पर्यटकांसाठी उपलब्ध असतात. प्रवासी संख्या ही जास्त आणि ई-रिक्षा कमी अशी स्थिती आहे. आमच्या रग्बी विभागात सुद्धा पेमास्टर पार्क पर्यंत ई-रिक्षा सेवा मिळावी अशी आमची मागणी आहे.अशा आशयाचे निवेदन देखील आम्ही मुख्याधिकारी यांना दिले आहे. याकरिता ई-रिक्षांच्या संख्येत वाढ होणे आवश्यक आहे.ई-रिक्षा आणखीन सुरू झाल्या तर याठिकाणी सर्वांना योग्य सेवा मिळेल.**
> **-शैलेंद्र दळवी, माजी अध्यक्ष कोकणवासीय समाज संस्था, माथेरान**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२६ सप्टेंबर
१) श्रीम.वनिता विजय वाईकर
श्रीबाग-२, अलिबाग, २६-९-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते
**कै. रत्नाकर नारायण म्हात्रे स्मरणार्थ, तारापूर, पालघर**

## नवी मुंबईत आज पाणी बंद

**नवी मुंबई :** जलशुद्धीकरण केंद्र व जलवाहिन्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी उद्या, २६ सप्टेंबर रोजी नवी मुंबई शहरासह कामोठे, खारघरमधील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे भोकरपाडा जलशुध्दीकरण केंद्र व मोरबे धरण ते दिघा मुख्य जलवाहिनीवर देखभाल दुरुस्तीसाठी गुरुवारी (२६ सप्टेंबर) सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र येथील पाणी पुरवठा १० तास बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे गुरुवारी संध्याकाळी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात, तसेच कामोठे व खारघर नोडमधील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तर शुक्रवारी (२७ सप्टेंबर) कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

## सुमित्रा खेडेकर यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षिक पुरस्कार

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा म्हसळा नं.१ च्या मुख्याध्यापिका तसेच अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ शाखा म्हसळाच्या तालुकाध्यक्षा सुमित्रा खेडेकर यांना आविष्कार फाऊंडेशन कोल्हापूरकडून ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून रविवारी २२ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय गुणवंत शिक्षिका पुरस्कार देण्यात आला.

आविष्कार फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष संजय पवार, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सोपान चांदे या सर्वांच्या उपस्थितीत सुमित्रा खेडेकर यांचा सन्मान करण्यात आला. खेडेकर यांनी म्हसळा आणि पनवेल तालुक्यामध्ये पंचवीस वर्षांपेक्षा अधिक सेवा करत असताना अनेक उपक्रम यशस्वी रित्या राबविले आहेत. त्यांच्या चांगल्या उपक्रमांचा मागोवा घेऊन त्यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आल्याबद्दल त्यांचे म्हसळा तालुका आणि रायगड जिल्ह्यात कौतुक केले जात आहे. त्यांच्यासोबतच बालाजी राठोड विषय शिक्षक वरवठणे मराठी, बशीर अहमद उल्डे केंद्रप्रमुख पाभरे, तब्बस्सूम कोंडविलकर, प्रफुल्ल पाटील, पीएनपी हायस्कूल पाष्टी मिणेकर सर नेवरुल, अब्दुल कयुम मुकादम जनाब, जावेद हजवाने, अश्विनी गुंडरे, अबिना बागवान यांनाही पुरस्काराने गौरविण्यात आले.

## पर्यटकांनी फिरवली काशीद बीचकडे पाठ

**। मुरूड । वार्ताहर ।**

कोकणात पर्यटनाचा हंगाम सुरू झाला असला तरी मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध काशीद बीचवर पर्यटक येत नसल्याने बीच सुनसान दिसून येत आहेत. त्यामुळे येथील स्थानिक व्यावसायिकांवर संकट ओढवले आहे.

गेल्या रविवारी जेमतेम १०० ते १५० पर्यटक आले होते; परंतु सोमवार, मंगळवार रोजी तुलनेने कमी पर्यटक काशीद बीचवर दिसून आले. निव्वळ पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या स्टॉल्सधारक, घरगुती निवास, हॉटेल्स, लॉजिंग, छोटे दुकानदार यांची आर्थिक अवस्था बिकट झाली आहे. पितृपक्ष सुरू असला तरी दरवर्षी येणारे पर्यटक गणेशोत्सवानंतर येत असतात. परंतु यंदा याच्या उलटी परिस्थिती असल्याने आलेल्या परिस्थितीला तोंड दिल्या शिवाय दुसरा पर्याय नाही, अशा



प्रतिक्रिया व्यवसायिकांनी व्यक्त केल्या. पावसाळ्यात काशीद बीच तीन महिने बंद असतो. याकाळात लॉजिंग आवारात गवत, झाडी झुडपे वाढून अस्वछता वाढलेली असते. आम्ही नव्या पर्यटन हंगामात प्रथम पैसे खर्चून स्वछता करून घेऊन पर्यटकांची प्रतिक्षा करीत असतो. रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटकांची वर्दळ सुरू झाली असताना प्रसिद्ध काशीद बीचवर पर्यटकांचा शुकशुकाट का ?

### व्यावसायिकांची चिंता वाढली

असा प्रश्न आम्हास पडला आहे.काशीद बीच वरील स्टॉलधारक संदेश चंद्रकांत रिकामे यांनी मागणी करताना सांगितले की, पावसाळ्यात बंद असलेल्या काशीद बिचवरील बोटिंग आदी जल करमणुकीच्या सुविधा त्वरित सुरू केल्या जाव्यात.

जंजिरा जलदुर्ग देखील खुला करावा. पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी देखील पर्यटक येत नसल्याने मोठी नामुष्कीची वेळ आली आहे. सुरूच्या झाडांच्या सानिध्यात विसावलेला काशीद बीच अतिशय सुंदर असून पर्यटन हंगामात लाखोंच्या संख्येने पर्यटक भेट देत असतात. काशीद बीच प्रमाणेच मुरूड बीचवर देखील पर्यटक नसल्याने पर्यटन व्यवसाय ठप्प झाल्याने व्यावसायिकांना चिंता लागली आहे. पर्यटनला सुरुवात झाली नाही, तर पुढील कालावधीत व्यावसायिकांची अवस्था कठीण होईल.

## गारमेंट युनिट करिता सुपरव्हायजरची गरज

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महिला व बाल विकास विभाग, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालय रायगड अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना डिपीडीसी अंतर्गत माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन या चार ठिकाणी महिला बचत गटातील महिलांना स्थानिक रोजगार मिळावा म्हणून प्रत्येक गारमेंट युनिट करिता आवश्यक असलेल्या शिलाई मशीन्स ७, काज-१, बटण-१ ओव्हालोंक मशीन-१, कटिंग मशीन १ व इस्त्री-१, खरेदी करण्यात आल्या आहेत.

या मशीन्सवर गारमेंटच्या अनुषंगाने गाऊन, पेटीकोट, लेगीज व टॉप, टी शर्ट, कापडी बॅग, मुस्लीम समाजासाठी लागणारे बुरका व शालेय गणवेश आदी कामाचे सुपरव्हिजन करणे व महिलांना प्रशिक्षण देण्याकरीता सुपरव्हायजर नियुक्त करावाचे असल्याने संपर्क साधावा.

## भात पिकावर आला करपा, बगळा रोगाचा प्रादुर्भाव

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यात खरीप हंगामात प्रामुख्याने भाताची शेती केली जाते. भाताच्या शेतीसाठी भरपूर पाणी आवश्यक असते, मात्र गेली काही दिवस पावसाचा लपंडाव सुरु असल्याने भाताची शेती धोक्यात आली आहे. त्यात भाताच्या पिकावर मोठ्या प्रमाणात बगळा रोगाचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, भाताची शेती वाचविण्यासाठी शेतकरी चांगला पाऊस व्हावा यासाठी आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

कर्जत या भाताच्या शेतीचे कोठार समजल्या जाणाऱ्या तालुक्यात यावर्षी



खरीपहंगामात १० हजारहुन अधिक हेक्टर जमिनीवर भाताची शेती केली आहे. सध्या भाताचे पीक अंतिम टप्प्यात असून कणसं तयार झाली असून भाताचे

### शेतकरी झाले हवालदील

पूर्ण पीक तयार होण्यासाठी आणखी काही दिवस पावसाच्या पाण्याची आवश्यकता आहे. गणेश उत्सव सुरु होण्याआधी पावसाने उघडीप घेतली होती आणि गणेश उत्सवात सुरुवातील पाऊस पडला मात्र नंतर पावसाने उघडीप घेतली असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. भाताच्या शेतामध्ये पाणीच उरले नसल्याने माळरानावर असलेली भाताची खाचरं हे पाण्याच्याअभावी सुकली आहेत. शेत सुकू लागली आहेत, तर दुसरीकडे पाण्याबरोबर शेतकऱ्यांना शेतात पडलेली रोगराई हि मोठी समस्यां बनली आहे.

शेतातील भातावर बहुसंख्य ठिकाणी बगळा रोगाने शिरकाव केला आहे. तर काही ठिकाणी करपा रोग देखील भाताच्या शेतात आढळून येत आहे. ऑगस्ट महिन्यात पावसाने विश्रांती घेतल्याने भाताच्या शेतात खोडकिडा रोगाचा प्रादुर्भाव झाला होता.

## स्मशानभूमीच्या कामाला गती

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ ग्रामपंचायतीची स्मशानभूमी आहे. त्या ठिकाणी सिमेंट बांधकाम असलेली स्मशानभूमी शेड बांधण्याच्या कामाला गती आली आहे. दरम्यान सध्या तात्पुरत्या स्वरूपात नेरळ ग्रामपंचायतीने बाजूला दोन स्टॅन्ड उपलब्ध करून दिले असून तेथे मृतदेहांवर अंत्यसंस्कार केले जात आहेत.



नेरळ ग्रामपंचायतीच्या हद्दीत साधारण ३० हजाराहुन अधिक लोकवस्ती असून या गावाची वाढ दररोज सुरु असून नेरळ ग्रामपंचायतीकडे असलेली एकमेव स्मशानभूमी अपुरी पडत आहे. त्यात पूर्वीचे स्मशानभूमी शेड हे पत्र्याचे असल्याने दरवर्षी त्या शेडची दुरुस्ती करावी लागत होती. कधी कधी स्मशानभूमी असलेले तीन स्टॅन्ड देखील कमी पडत असल्याने प्रशस्त स्मशानभूमी शेड उपल्बध करून देण्याची मागणी सातत्याने केली जात होती. लाकडे ठेवण्यासाठी स्वतंत्र खोली बांधण्यात आली असून स्मशानभूमीसाठी आरसीसी बांधकाम करून प्रशस्त स्मशानभूमी शेड बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.

नव्याने बांधण्यात येत असलेल्या समशानभूमी शेड मध्ये एकाच वेळी तीन मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची व्यवस्था होनार आहे. त्याचवेळी सध्या अस्तिवात असलेली तात्पुरती बनवलेली स्मशभूमी हि देखील भविष्यात मदतगार ठरणार आहे.मात्र नवीन बांधकाम लवकरात लवकर पूर्ण व्हावे अशी अपेक्षा नेरळ ग्रामस्थांना आहे. स्मशानभूमी शेड बांधण्यात येत असल्याने पुढील काही वर्षे स्मशानभूमीमध्ये अतिरिक्त खर्च करण्याची जबाबदारी नेरळ ग्रामपंचायतीवर येणार नाही.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे लवकरच लोकार्पण

**। आगरदांडा । वार्ताहर ।**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मुरुड अलंकापुरी येथील ऐतिहासिक भूमीत भव्य स्मारकाचा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. डॉ. बाबासाहेबांच्या अनुनायांसह सर्व तालुक्यांतील जनतेला हे स्मारक मानवतेचा संदेश देणार असून शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा या त्रिसूत्रीचा वस्तुपाठ देणारे एक शक्तीपीठ म्हणून अखंड प्रेरणादायी ठरेल.

मुरुड भेटीच्या प्रेरणेने मुरुड तालुका बौद्धजन सेवा मंडळाने मुरुड शहरात बाबासाहेबांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. या स्मारकामध्ये प्रशिक्षण केंद्र, सुशिक्षित-अशिक्षित महिला, युवा, कामगार, दुर्बल व अपंग-दिव्यांग घटक यांना स्वावलंबी होण्याकरिता विविध रोजगाराभिमुख विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमासाठी सर्व सुविधायुक्त भव्य सभागृह, सर्व सुविधायुक्त वसतीगृह, विपश्यना केंद्र, वस्तुसंग्राहलय, ग्रंथालय-वाचनालय, व्यसनमुक्ती केंद्र अत्याधुनिक व्यायामशाळा आदी उभारले जाणार आहेत.

ठेकेदार मुसव्विर जमादार यांनी सांगितले की, लवकरात लवकर काम पुर्ण होण्यासाठी रोज १५० कामगार काम करीत आहेत. ८ ते १० दिवसात काम पुर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, मौजे इंद्रपै, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीतील विद्यमान मालक १. प्राची मिलिंद गोखले, २. माधवी संजीव जोशी, ३. मंदार रमेश कर्वे, ४. रजनी रमेश कर्वे, ५. विनय पुरूषोत्तम कर्वे, ६. विवेक पुरूषोत्तम कर्वे, ७. शुभांगी प्रमोद रास्ते, ८. प्रभाकर रामचंद्र कर्वे यांनी त्यांचे मालकीचा अविभक्त हिस्सा विकणेचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| इंद्रपै, ता. अलिबाग जि. रायगड | ३९ | ०-२०-५० पो.ख. ०-०२-८० एकूण ०-२३-३० | ५-०० |

सदर मिळकतीतील विद्यमान मालकांच्या मालकीच्या अविभक्त हिश्श्याची मिळकत.

तरी वर नमूद मिळकतीतील विद्यमान मालकांच्या मालकीच्या अविभक्त दान, बक्षिस, लीज, फरोक्त, हिश्श्याचे मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्गासह आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहेत असे समजून, मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २६-९-२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

### पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### ई-निविदा सुचना

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/४४२४/प्र.क्र.८५/४०६१/२०२४ दिनांक : २५/०९/२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-२ बाब निहाय दर पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/१९८/२०२४-२५ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका मालकीच्या इमारतीची देखभाल व दुरूस्ती(नुतनीकरण) वार्षिक तत्वावर करणे. (३ वर्षाकरीता) | १४,२०,९५,९६५/- |

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.२६/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त -I**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

सर्वांना जाहीररित्या कळविण्यात येते की, माझे अशील हे खालील तपशिलात नमूद शेत जमीन खरेदी करू इच्छितात. जाहीर नोटिशीचे तात्पर्य असे की, जर कोणा व्यक्तीला सदर जमिनीसंदर्भात कुठला आक्षेप असेल किंवा कुठल्याही प्रकारचे स्वारस्य असेल तर त्यांनी लिखित खाली नमूद वकीलांशी, नोटीस प्रकाशित झाल्यापासून १० दिवसांच्या आत संपर्क साधावा. त्या नंतर पुढे कुठल्याही प्रकारच्या हरकतींना न जुमानता, पुढील जमिनीचा व्यवहार कायदेशीररित्या पार पाडला जाईल याची नोंद असावी.

**जमिनीचा तपशील**
**गाव-बीड-बुद्रुक, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**
विक्री करणार- (a) श्रीमती. मेधा विवेक पुराणिक,
(b) श्री. विवेक विष्णू पुराणिक,

| गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे-आर) | आकार (Rs-Ps) |
|---|---|---|---|
| १५ | ५ | ००-०४-८० | ०.०९ |
| १४ | ३/A | ००-०८-८० | ०.१६ |

दि. २५/०९/२०२४, ठिकाण - नवी मुंबई,
M/s V R Legal and Co.
ऑफिस -२२५, थापर कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ५१. सेक्टर- १५, सी.बी.डी., बेलापूर, नवी -मुंबई, मो-७७७७०७७८९९,
ई मेल-mail@vrlegals.com

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरसोली, ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत विद्यमान मालक श्री. नितीन सूर्यकांत लाखे यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग, जि. रायगड | २५६/१/८ | २-८५-०० एकूण | २८.५० |

तरी वरील २-८५-० हे. आर मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्गासह आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २६-९-२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

SHRIRAM Finance
**श्रीराम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स कंपनी लिमिटेड या नावाने ओळखली जात होती)**

**सार्वजनिक सूचना**

आमच्या ग्राहकांना व सर्व नागरिकांना कळविण्यात येते की आमची **पनवेल - I शाखा** जी पहिला मजला, शिव पार्वती अपार्टमेंट, प्लॉट नं. ५, सेक्टर ४, नवीन पनवेल, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४१०२०६ येथे आहे ती ३१ डिसेंबर, २०२४ पासून तळ मजला, फ्लॅट नं. ००२, प्लॉट नं. २९, नील आंगण बिल्डींग, सेक्टर -१९, पनवेल, पनवेल, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६ येथे स्थलांतरीत केली जाईल.

ग्राहकांना विनंती करण्यात येते की त्यांनी नवीन पत्त्यावर संपर्क साधावा.

**प्रादेशिक व्यवसाय प्रमुख**

# व्यापाऱ्यांचे 'शटर डाऊन'

■ आठवडे बाजार विरोधात व्यापारी एकवटले

■ आंदोलनात शेकडो व्यापाऱ्यांचा सहभाग

**। पनवेल । वार्ताहर ।**

**शासन, महापालिका, ग्रामपंचायत, वीज वितरण व अन्य शासकीय संस्थांना मालमत्ता व इतर कर जीएसटी व्यापाऱ्यांनी भरायचा अन् शासन आणि महापालिकेने बेकायदा आठवडे बाजार, फिरते व्यापारी, पदपथावरील दुकानदार यांना मोकाट सोडून त्यांना संरक्षण द्यायचं. या महापालिका व शासनाच्या भूमिकेविषयी कामोठ्यामधील व्यापारी मंगळवारी (दि.२४) सकाळपासून आक्रमक झाले होते. त्यांनी सकाळपासून सायंकाळी ४ वाजेपर्यंत सर्व बाजारपेठ बंद ठेवून शासनाचा जाहीर निषेध केला होता.**

कामोठे वसाहतीमध्ये पदपथावरील फिरते व्यापारी, पदपथाच्या बाजूला लावणारे ठेले, तसेच कामोठ्यात भरणारे आठवडे बाजार यामुळे व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर मोठी कुऱ्हाड कोसळत आहे. येथील व्यापारांना व्यापारासाठी कोट्यवधी रुपयांचे गाळे विकत घेऊन किंवा लाखो रुपये भाडे भरून शासनाला, महापालिकेला, महावितरणला, इन्कम टॅक्स, तसेच सर्वत्र टॅक्स भरून त्यातूनच व्यवसाय करावा लागत आहे. मात्र, खुलेआम पदपथावर मोकळ्या जागेत आठवडे बाजार भरून व्यापाऱ्यांच्या धंद्यावर पाणी फिरवले जात आहे. तसेच, पदपथावरील व्यावसायिकांनी कचरा करायचा व प्लास्टिकच्या पिशव्यांच्या बेकायदा वापर करायचा याकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असून जो कर आणि जीएसटी भरत आहे



त्याच्यावर पालिका कारवाई करत आहे. असा प्रकार गेल्या अनेक वर्षापासून पालिका करत आली आहे.

यावेळी मेटाकुटीस आलेल्या व्यापाऱ्यांनी संघटना करून शासनाचा व महापालिकेचा निषेध करत आठवडे बाजार कायमचे बंद व्हावे, यासाठी मंगळवारी सकाळपासून दुकाने बंद करून आंदोलनाचे हत्यार उपसले होते. या आंदोलनात जवळपास कामोठ्यातील साडेचारशे व्यापारी सहभागी झाले होते. यावेळी 'आठवडा बाजार बंद करा', 'फेरीवाले बंद करा'च्या घोषणांनी कामोठे परिसर चांगलाच दुमदुमला होता. अखेरीस महापालिकेचे विभाग अधिकारी सदाशिव कवठे यांनी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नाना मगदूम यांची व पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन आठवडे बाजार, फेरीवाले, हातगाडीवाले कायमस्वरूपी बंद करण्याचे ठोस आश्वासन दिले.

यानंतर व्यापाऱ्यांनी आपले 'दुकाने बंद आंदोलन' मागे घेत सायंकाळी ४ वाजता दुकाने उघडली.

## कोळंबी मासेमारीत पावसाचा अडसर

**मुरूड शहर :** सोमवारपासून परतीच्या पावसाचा खेळ सुरू झाला आहे. मागील आठवड्यात मुरूड समुद्रात मोठ्या प्रमाणात लाल रंगाची टायनी कोळंबी मच्छिमारांना मिळाली होती. गेले दोन दिवस पावसामुळे कोलंबी मासळी मिळेनाशी झाल्याने एकदरा, मुरूड, राजपुरी येथील नौका नांगरण्यात आल्या; मात्र बुधवारी सकाळी (दि.२५) किमान ३५ नौका पुन्हा कोळंबी मासेमारीस गेल्याचे दिसून आले. अनेक मच्छिमारांनी सांगितले की, सध्या पद्मजलदुर्गाजवळ कोळंबी मोठ्या प्रमाणावर मिळत असताना अचानक परतीच्या पावसाचा मोठा अडसर निर्माण होत असून, आमचे मोठे नुकसान होत आहे. सकाळी आकाश निरभ्र तर दुपारी, सायंकाळी आभाळ भरून पाऊस सुरू होत आहे. या मासेमारीत कधी सोलट कोळंबी, तर कधी टायनी किंवा चैती जातीची कोळंबी सापडेल याचा भरोसा नाही.



## सिग्नल पार करताना खड्ड्यांचा अडथळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल-शिळफाटा मार्गावर नेहमी वाहनांची वर्दळ असते. तळोजा वसाहतीत प्रवेश करताना आणि बाहेर पडताना चारही बाजूला वाहतूक कोंडी होत असल्यामुळे तळोजा वाहतूक पोलिसांनी शीघ्र कृती दलासमोरील चौकात सिग्नल यंत्रणा कार्यान्वित केली आहे. दरम्यान, पनवेल, मुंब्रा आणि खारघर तसेच शिळफाटाकडे जाताना सिग्नल यंत्रणेलगत असलेल्या रस्त्याची दुरवस्था झाली असून, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. यात सिग्नल पार करण्यासाठी केवळ तीस सेकंदच वेळ असतो. रस्त्यावर पडलेल्या खड्डयात वाहने अडकण्याची भीती असल्यामुळे मोठी कसरत करावी लागत आहे. सिग्नल ओलांडताना खड्डयात पडून अपघात होण्याची शक्यता असून, महापालिकेने अपघात टाळण्यासाठी रस्त्यावरील खड्डे बुजवावेत, अशी मागणी होत आहे.

# मुंगोशी बौद्धवाडी हक्काच्या रस्त्यापासून वंचित

**। पेण । वार्ताहर ।**

आपला देश २१व्या शतकात प्रगतीच्या मार्गावर असताना, रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील मुंगोशी बौद्धवाडी मात्र अजूनही मूलभूत सुविधा आणि हक्काच्या रस्त्यापासून वंचित आहे. स्वातंत्र्याचा ७५वा अमृतमहोत्सव आणि चांद्रयान यांसारख्या मोठ्या उपलब्धींना देशभरात जल्लोष साजरा केला गेला. परंतु, या छोट्याशा वाडीतील परिस्थिती आजही जैसे थेच आहे.

मुंगोशी बौद्धवाडीतील ग्रामस्थांना हक्काचा रस्ता मिळावा यासाठी अनेक वर्षे संघर्ष करावा लागत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या या वाडीला आजवर पायाभूत सुविधा मिळालेल्या नाहीत. बेलवडे व मुंगोशी भागात रस्ते आहेत, परंतु बौद्धवाडीकडे जाण्यासाठी कोणताही रस्ता उपलब्ध नाही. या वाडीतील लोकांना दोन शेतांमधून आणि झाडीझुडपांतून पायवाट काढत साप-विंचूच्या भीतीतून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात रस्त्याची स्थिती अधिकच बिकट होते. शाळकरी मुलांना, आजारी व्यक्तींना आणि गर्भवती महिलांना प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यातच वैद्यकीय आपत्कालीन सेवा वेळेवर न मिळाल्यामुळे अनेक आजारी व्यक्तींचे प्राण गेले आहेत.

तसेच, गावात कोणतेही वाहन येऊ शकत नसल्यामुळे वाहने गावाबाहेरच पार्क करावी लागतात. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वारंवार निवेदने दिल्यानंतरही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. ग्रामपंचायत, गटविकास अधिकारी, जिल्हा परिषद, तहसीलदार आणि जिल्हाधिकारी



यांच्याकडे निवेदने दिली असूनही या समस्येचे निराकरण झालेले नाही. २०१८ साली जिल्हा परिषदेकडून रस्त्यासाठी २० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. नकाशात रस्ता क्रमांक १३४ असा नोंदवलेला असूनही प्रत्यक्षात रस्ता निर्माण झालेला नाही. या परिस्थितीमुळे मुंगोशी बौद्धवाडीला मूलभूत सुविधा मिळत नाहीत.

तसेच, सार्वजनिक शौचालये जीर्ण झाली आहेत. पथदिव्यांचे लोखंडी खांब वाकले असून ते कधीही कोसळण्याच्या स्थितीत आहेत. ग्रामस्थ हिरामण भोजने आणि इतरांनी अनेक वर्षे प्रशासनाचे उंबरठे झिजवले असतानाही त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. राज्य शासनाची मातोश्री

> **१०० वर्षांहून अधिक काळ लोटला असून आमच्या बौद्धवाडीला अद्याप हक्काचा रस्ता मिळालेला नाही. वाडीतील व्यक्ती आजारी पडली तर त्याला झोळीमध्ये घेऊन न्यावे लागते. पावसाळ्यात झाडीझुडपांतून पायवाट काढत साप-विंचूच्या भीतीतून प्रवास करावा लागतो. प्रशासनाकडे खूप वेळा अर्ज विनंती करूनदेखील आम्हाला रस्ता मिळत नाही. प्रशासनाला आमची दया कधी येईल?**
> **- हिरामण भोजने, ग्रामस्थ**

शेत पाणंद रस्ते योजना आणि तहसीलदारांच्या अधिकारांतर्गत रस्ता खुला करण्याचे अनेक पर्याय असतानाही याप्रश्नावर उद्यापही तोडगा निघालेला नाही.

# 'स्त्री शक्ती कायदा लागू करा'

■ ठाकरे गटाचे सहा. पोलीस आयुक्तांना निवेदन

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्यात स्त्री शक्ती कायदा लागू करा, यासाठी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीने जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे.

२०२३ मध्ये राज्यात महिलांवर सतत होणाऱ्या अत्याचारांचा विचार करता राज्यात बलात्काराच्या ७,५२१ घटना, अपहरणाच्या ९,६९८ घटना, हुंडाबळीच्या १६९ घटना, नातेवाईकांकडून क्रूर पद्धतीने त्रासाच्या ११,२२६ घटना, विनयभंग, लैंगिक अत्याचाराच्या १७,२८१ घटना घडल्या आहेत.



तसेच, मुंबईमध्ये मे महिन्या अखेर बाललैंगिक अत्याचार घटनेसंदर्भात ५०९ गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत. ही आकडेवारी चिंताजनक असून, राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडालेला आहे. वारंवार महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात स्त्री शक्ती कायदा अंमलात आणण्याबद्दल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांची भेट घेत त्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिरीष घरत, दीपक घरत, स्नेहल आंबेकर, समिक्षा सक्रे, नेहा माने, श्रेया परब, कल्पना पाटील, रेवती सकपाळ, प्रमिला कुरघोडे, अनिता डांगरकर, अर्चना कुळकर्णी, प्रवीण जाधव, कुणाल कुरघोडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## मुख्याध्यापकपदी भाईदास पाटील

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरातील जनता एज्युकेशन सोसायटी अँड ट्रस्टद्वारा संचालित हिंदी माध्यमाचे नामांकित विद्यालय आहे. या नवीन शैक्षणिक वर्षापासून संस्थेने डॉ. भाईदास पाटील यांची मुख्याध्यापकपदी नियुक्ती केली आहे. पाटील हे हिंदी साहित्याचे अभ्यासक, लेखक, कवी असून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्यरत होते. नुकतेच नवीन शैक्षणिक धोरणासाठी त्यांची महाराष्ट्र राज्याच्या सदस्यपदीही निवड झालेली आहे. मुख्याध्यापकपदी निवड झाल्याबद्दल विजय सिंह वर्मा, एम.आर.पाण्डे, राजीव बोहरा तसेच सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **वरसोली, रायगड** आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- **किहीम, रायगड** समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- **चौल, रायगड** मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- **घरात घरकाम व मुलाची देखभाल** करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.
- **कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा.लि. फीडमिल प्लान्ट** EICHER करीता TRANS परवानाधारक वाहनचालक पाहिजेत पगार १३०००/-+ भत्ता २००/५००/९०० TRIP नुसार संपर्क : HR अनुष्का राऊत - ७७९८८८३८६४
- **अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत.** ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- **वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे.** संपर्क-९७६२७७७९७५.
- **नांदगाव-मुरूड येथील कॉटेज श्री समर्थ रिसॉर्ट** भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९७६९४७४०६३
- **काशिद बीच येथील गेस्ट हाऊस भाडेतत्वावर** चालविण्यास देणे आहे. संपर्क : ९५२७०६२४०८
- **आमच्या अलिबाग येथील कार्यालयात एका कुशल** टायपिस्टची गरज आहे. उमेदवाराने मराठी आणि इंग्रजी भाषेत उत्तम टायपिंग कौशल्य असावे. संगणकाचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी खालील पत्त्यावर अर्ज पाठवावा. पत्ता : अष्टगंधा सोसायटी, रायवाडी कॉम्प्लेक्स, चेंढरे, अलिबाग. संपर्क- ७७९८४०५३८३
- **अगस्त्य फाऊंडेशन या नामांकित समाजसेवी संस्थेच्या अलिबाग शाखेत** INSTRUCTOR या पदासाठी मुलाखती चालू आहेत. पात्रता- पदवीधर (BSc/MSc/BEd/DEd/BE) निवड प्रक्रिया- लेखी पदवीधर व मुलाखत. मो. रोहन म्हात्रे- ७९७२२१९३६२, ईश्वर पाईकराव- ८५५२८७७३७४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## एलईडी मासेमारीवर कारवाई कधी?

**। उरण । वार्ताहर ।**

उरण परिसरात एलईडी प्रकाशझोतात मासेमारी जोरात सुरू आहे. याकडे मत्स्यविभागाचे अधिकारी कारवाई करीत नसल्याची धक्कादायक माहिती छोटे मासेमारी करणाऱ्या मच्छिमार बांधवांनी दिली आहे. रायगडसह रत्नागिरी, पालघर या जिल्ह्यात दादली पद्धतीने मासेमारी प्रचलित आहे. एलईडी आणि पर्सनेट मासेमारीमुळे पारंपरिक पद्धतीने मच्छीमारी करणाऱ्यांना मासळी मिळत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. आधुनिक तंत्राद्वारे समुद्रात रात्री मोठ्या विद्युत प्रकाशझोतात मासळीला आकर्षित केली जाते. यामुळे स्थानिक मच्छिमार खोल समुद्रात जाऊनही अपेक्षित मासळी मिळत नसल्याची तक्रार करीत आहे. बेकायदेशीर मासेमारीवर कोणी कारवाई करायची, याबाबत सुसूत्रता नसल्याने चालढकल केली जात आहे. यामुळे कडक कारवाई कधी आणि कोण करणार, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



## तालुक्यात सर्वत्र नवरात्र उत्सवाची लगबग सुरु

**। तळा । वार्ताहर ।**

तालुक्यात गणेशोत्सवानंतर अवघ्या आठवड्यावर नवरात्र उत्सव येऊन ठेपला असल्याने नवरात्र उत्सव मंडळ तयारीला लागले आहेत.

तरुण व तरुणी या दिवसांची आतुरतेने वाट पाहात असतात. यामध्ये देवीच्या आराधनेसोबतच नृत्यकलाही मोठ्या प्रमाणात सादर होत असते. तरुणाई नऊ दिवस नऊ रंगाचे कपडे परिधान करत असतात. देवीची पूजा आरती करून रात्री गरबा रासचा आनंद लुटला जातो.

नवरात्र उत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असल्याने तालुक्यातील सार्वजनिक मंडळांनी आपल्या आवडीची मूर्ती बुकिंग करण्यास सुरुवात केली आहे. उत्सवासाठी लागणारे मंडप, साऊंड सिस्टीम, हार, वेणी, फुले यांसह नऊ दिवस घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात देवीभक्त मग्न झाले आहेत. मूर्तींच्या कारखान्यात रंगकाम करणारे कारागीर देवीच्या मूर्तींवर शेवटचा हात फिरविण्यात व्यस्त आहेत. यंदा डिझाईन व हिरेजडित देवी मूर्तींना पसंती आहे.

## अनोळखी इसमाचा मृतदेह

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहर पोलीस एका मृत व्यक्तीच्या नातेवाईकाचा शोध करीत आहेत. या इसमाचे नाव संजय जशराज पांडे (३५) असे आहे. रंग गोरा, अंगाने सडपातळ, केस काळे, दाढी मिशी काळी वाढलेली असून, अंगात लाल रंगाचा फुल बाह्याचा टी-शर्ट व ग्रे रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा.

## महिलांसाठी अनोखा उपक्रम

**। पनवेल । वार्ताहर ।**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे थेट विणकर ते ग्राहक विक्री अंतर्गत महिला वर्गासाठी पनवेलमध्ये प्रथमच खास येवला येथील कापसे पैठणीचे भव्य प्रदर्शन व विक्रीसाठी आयोजन करण्यात आले आहे. गणपती मंदिर हॉल मिडल क्लास हौसिंग सोसायटी मैदानाजवळ दि.२७, २८, २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत या भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कामगार नेते महेंद्र घरत, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, डॉ.गिरीश गुणे, रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. शैलेश पोटे, रो. सचिव दिपा गडगे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या ठिकाणी ५०० रुपयांपासून ते ५० हजारापर्यंत पैठणी विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे. तसेच, येवला प्युअर पैठणी, ब्रोकेड पैठणी, सेमी पैठणी, कांजीवरम सिल्क, चंदेरी, प्युअर सिल्क, इरकली, माहेश्वरी, पैठणी ड्रेस मटेरियल, पैठणी दुपट्टा, पर्स, उपाडा व इतर अनेक साड्या येथे विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत. तरी या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष शैलेश पोटे यांनी केले आहे.

# रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवीन पनवेल रोटरी क्लब ऑफ स्टील टाऊन यांच्यावतीने आयोजित रक्तदान शिबीर कार्यक्रमाला रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी १२७ लोकांनी रक्तदान केले.

रोटरी क्लब पनवेलतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याने डिस्टिक गव्हर्नर यांनी या कार्यक्रमाचे व अध्यक्ष मीनाक्षी भटनगर यांचे कौतुक केले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता नवीन पनवेलच्या आरएसएस शाखेने मेहनत घेतली आहे. यामुळे क्लबच्यावतीने आरएसएस शाखेचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमासाठी ला. यशवंत ठाकरे, बन्सीधर, गईरोला, वाय.पी. सिंग, अहुजा, सरिता सदरांनी, हरणीशा शेट्टी, जुल्का, श्रेया, जागृती, सरिता यांची प्रमुख उपस्थिती होती. शेवटी प्रत्येक रक्तदात्याचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कर्जतमध्ये 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा साजरा

# विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून दिला स्वच्छतेचा संदेश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत नागरपरिषदेमध्ये हरित कर्जतसाठी 'स्वच्छता ही सेवा' हा स्वच्छता पंधरवडा साजरा केला जात आहे. यानिमित्ताने कर्जत शहरात अभिनव ज्ञान मंदिर शालेच्या विद्यार्थ्यांनी जनजागृतीसाठी पथनाट्य सादर केले होते. दरम्यान, पथनाट्य अंतर्गत शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी कचरा व्यवस्थापन, आरोग्य, स्वच्छता आणि प्लास्टिक टाळा हा स्वछता संदेश सर्वांनी अंमलात आणावा, असे आवाहन पालिका प्रशासक आणि मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी केले.**

कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि प्रशासक वैभव गारवे यांच्या माध्यमातून शहरात स्वच्छता पंधरवडा साजरा होत आहे. यानिमित्त रायगड जिल्हा परिषद, जिल्हा स्वच्छता विभाग व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत 'स्वच्छता हीच सेवा' अभियानांतर्गत कर्जत नगरपरिषद, अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत नगरपरिषदेच्या भव्य प्रांगणामध्ये पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

यावेळी मुख्याधिकारी गारवे यांच्यासह पालिका अधिकारी तसेच अभिनव प्रशालेचे मुख्यध्यापक शिंदे, पर्यवेक्षक अनिल गलगले



आदी प्रमुख उपस्थित होते. या पथनाट्याच्या संकल्पना आणि हेतू याबद्दल शिक्षक संजय देसले यांनी माहिती दिली. यावेळी स्वच्छताविषयक जनजगृती करणारे पथनाट्य अभिनव शाळेच्या गाईड विभागातील विद्यार्थ्यांनी सादर केले. शाळेच्या शिक्षिका जयमाला जांभळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने कचरा- व्यवस्थापन पथनाट्य व विद्यार्थी अभिनय, साहित्य जुळवाजुळव, विद्यार्थी ड्रेपरी तसेच स्वच्छता संदेश, प्रतिज्ञा लेखन व स्वच्छता नाटिका यासाठी शिक्षिका वैशाली ढोले, सोनाली चव्हाण आणि अनिल गालगले यांचे मागर्दशन लाभले. शाळेचा विद्यार्थी तेजश्री ढोले आणि इतर विद्यार्थी यांनी गाण्यांना साथ दिली, तर संगीत विभागात आर्यन देशमुख, अथर्व फराट, श्रवण शिर्के व इतर सहाय्यक विद्यार्थी यांचा सहभाग राहिला.

पथनाट्य निर्मितीत आवाजाच्या विशेष शैलीत कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थिनी तेजस्विनी ठमकेची महत्त्वपूर्ण भूमिका होती. तर सहाय्यक म्हणून जान्हवी डफळ, युक्ती कुलकर्णी यांचा सहभाग लाभला.तसेच, या पथनाट्याची विशेष बाब म्हणजे दोन दिव्यांग विद्यार्थिनींनीदेखील सक्रिय सहभाग घेऊन उत्साह वाढवला होता. कचरा व्यवस्थापन पथनाट्य यामध्ये क्षत्रीय मोहित, अनुष्का गायकवाड, सिद्धी गायकवाड, मधुरा पवार, तेजश्री ढोले यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

### प्लास्टिक वापराचे भयाण सत्य

**आज आपल्याला भेडसावत असलेल्या पर्यावरणीय समस्यांपैकी प्लॅस्टिक ही सर्वात गंभीर समस्या बनली आहे. भारतात दरवर्षी सुमारे ३.५ दशलक्ष टन प्लास्टिक कचरा निर्माण होतो. महापालिका घनकचरा, ऑटोमोबाईल कचऱ्यापासून २०२५ पर्यंत कचऱ्याचे प्रमाण ३ पटीने वाढण्याची अपेक्षा आहे. प्लास्टिकचा एक दशांशपेक्षा कमी पुनर्वापर केला जातो. या अनुषंगानेच जनजागृतीपर प्लास्टिक टाळा हे पथनाट्य सादर केले गेले.**

# दुकान फोडून लाखोंचा माल लंपास

**कोलाड :** मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड आंबेवाडी नाका बाजारपेठेतील तटकरे पार्क येथील बनारस जनरल स्टोअर्सचे मालक फुलंचद जैस्वाल यांच्या दुकानातून अंदाजे १ लाख ७५ हजार रुपये ते दोन लाख रुपयांपर्यंत रुपये किमतीचा सिगारेटचा माल तसेच १५००ते १६०० रोकड चिल्लर दुकानाचा लॉक व स्वेटर तोडून चोरट्यांनी मुद्देमासाहित लंपास केला. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, मंगळवार, दि. २४ सप्टेंबर रोजी मध्यरात्री आंबेवाडी बाजारपेठेतील बनारस जनरल स्टोअर्सचे मालक फुलचंद जैस्वाल यांच्या दुकानाच्या शटरचे लॉक तोडून दुकानातून फोर्सकर, क्रश, गोल्डफ्लॅक, इंडिमेंट, ॲडव्हान्स, क्लोमिक्स, लाईट, डबल बटण, गोल्डफ्लॅक किंग, लाईट, क्लासिक आईसबर्ड, माईल्ड, अशा विविध प्रकारच्या सिगारेटचा अंदाजे एक लाख ७५ हजार ते २ लाखांपर्यंतचा माल तसेच १५०० ते १६०० रुपयांची चिल्लर चोरट्यांनी लंपास केली आहे.

## शिक्षक पाहिजे

कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर, कर्जत-कर्जत नरपरिषदेजवळ, कर्जत या स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील वर्गांसाठी खालील पदे भरायची आहेत.

| अनु.क्र. | विषय | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | B.A.B.ed | ०१ |
| २ | समाजशास्त्र | B.A.B.ed | ०१ |

इच्छुक उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रासह सकाळी ११ ते ३ या वेळेत कार्यालयात संपर्क साधावा.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नाटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक पुष्पा रघुनाथ खांबे, किरण रघुनाथ खांबे, मिलिंद रघुनाथ खांबे, संध्या अशोक ब्रेंदे, गुलाब बंडु खांबे, निलेश बंडु खांबे, मनोज बंडु खांबे, स्वाती अनंत गोंडाळ, प्रज्ञा प्रफुल्ल घुमे, सुषमा शांताराम बडद, दिव्यानी शांताराम बडद, दिप्ती शांताराम बडद, निर्मला दत्ताराम खांबे, रमेश दत्ताराम खांबे, सुनिता गोपीनाथ मांडवकर, सुरेश दत्ताराम खांबे, अनिता जनार्दन गोतावडे, चंद्रकांत दत्ताराम खांबे, रंजना वसंत तिर्लोटकर, वत्सला वासु बाणे, आनंदी रामा कानसे, अनुसुया दत्ताराम खांबे यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकतीमधील मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कोळगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| मौजे | भुमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| कोळगांव, ता. अलिबाग, जि. रायगड | १४० | ०-४०-०० पो.ख. ०-०२-५० ०-४२-५० | १०-२५ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २६/०९/२०२४

**ॲड. रविंद्र वि. ओक**
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड

## Anjuman Islam Janjira Murud, Murud Janjira Raigad
## Requires

Applications are invited for the post of Junior Clerk from candidate for the following Aided High School.

| Sr. No. | Name of School | No. of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Anjuman Islam Janjira High School Shriwardhan, Tal. Shriwardhan | 1 | B.A/B.Com/ B.Sc MS-CIT |

apply within 7 days to the Gen Secretary Anjuman Islam Janjira Murud
**Email Id: aijheadoffice1907@gmail.com**
टिप :- उमेदवारांना मराठी, इंग्रजी येणे आवश्यक आहे.
**Note : Preference should be given to Marathi English knowing candidate.**
**Note :** After Scrutiny of all applications received only those candidate will be informed of the **"Walk in interview"** who satisfy of all the norms and qualification

**Gen Secretary**
Anjuman Islam Janjira Murud

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनकडून आमचे अशिल मेसर्स जी डी वेनचर्स पार्टनरशिप फर्म यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या शेती/रापड जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- शेलु, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| श्री. नामदेव काशिनाथ शेकटे, लक्ष्मीबाई नथू शेकटे, रोहिणी नामदेव पावशे, श्री. रोहीदास नथू शेकटे, श्री. महेश नथू शेकटे, | १०१/१ | ०-४९-२० पोट ख. ०-०२-०० एकूण ०-५१-२० | ४.५८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता : लक्ष्मी अपार्टमेंट,
सदनिका क्रं. १०८ पहिला मजला,
शेलु स्टेशन जवळ (पु) बांधिवली.
ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण : कर्जत

सही
**ॲड. सूर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक : २६/०९/२०२४
मो.नं. ९९२२१५५१५३,

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिल श्री. हरिश्चंद्र चांगु भोपी रा.बेलोशी, पो.मल्याण, ता.अलिबाग जि.रायगड वगैरे यांच्या वडीलोपार्जित सामाईक मालकीची व एकत्र कुटुंबाच्या मिळकती मौजे आंदोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथे असून त्या मिळकतीचे विस्तृत वर्णन खालीलप्रमाणे

मौजे आंदोशी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील १) गट नं. २, क्षेत्र ०-३३-६० हे.आर. आकार ७.०६ रू. पै. २) गट नं. ८७, क्षेत्र ०-४४-८० हे.आर. आकार ९.४४ रू. पै.

वरील वर्णनांकित मिळकतीबाबत अलिबाग येथील मे. उपविभागीय अधिकारी सो. यांच्या न्यायालयात आर.टी.एस. अपिल नं. ४९/२०२४ प्रलंबित आहे. सदर मिळकतीत आमच्या आशिलांचा अविभक्त हिस्सा आहे.

सदरच्या मिळकती या आमच्या आशिलांच्या वडिलोपार्जित मिळकती असून कोणालाही सदरच्या मिळकती विकण्याचा कुठलाही हक्क व अधिकार नाही. सदरच्या मिळकतींबाबत कुठल्याही प्रकारचा व्यवहार करण्यास आमच्या आशिलांची सक्त हरकत आहे.

तरी वरील नमुद मिळकतीबाबत कुणाही व्यक्तीबरोबर कुठलाही व्यवहार उदा. खरेदी, विक्री, साठेकरार, बक्षीसपत्र, अखत्यारपत्र वगैरे अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपरही कुणीही सदर मिळकतीसंदर्भात कसल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची याद्वारे सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २५/०९/२०२४

सही/-
**ॲड. जी. के. पाटील**
**जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. राहुल रसिकलाल नहार यांनी त्यांचे स्वकष्टार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे वंजारपाडा, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड ४१०१०१ येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

| भूमापनकमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ३८/१२ | ०.१५.०० | ०.१२ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट ताबा, बयाणा, पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख -२६/०९/२०२४

सही /-
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
मो. न. ८३६९२१७३१३

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांची खालील वर्णनाच्या मिळकती सर्व हक्कांगासह विकत घेण्याबाबत मिळकतींच्या विद्यमान मालकांसोबत बोलणी सुरू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) निगडे, ता. अलिबाग | ६/२/अ | ०-३१-४० पो.ख. ०-०२-३० एकुण ०-३३-७० | ४.६३ | १) केशव रघुनाथ गिजे २) चिंतामण रघुनाथ गिजे ३) मालती उर्फ वैशाली वसंत किंजळे ४) शेवंती रामचंद्र आग्री ५) गोपीनाथ चंदर गिजे |
| २) निगडे, ता. अलिबाग | ६/२/ब | ०-३१-१० पो.ख ०-०२-०० एकुण ०-३३-१० | ४.६२ | १) केशव रघुनाथ गिजे २) चिंतामण रघुनाथ गिजे ३) मालती उर्फ वैशाली वसंत किंजळे |

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख २५/०९/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

## मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव सोमवार दिनांक २८/१०/२०२४ विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून (७ दिवस) दिनांक २५/१०/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार भरणा करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार** १. श्रीमती वैशाली वसंत थळे २. श्री वसंत बाळकृष्ण थळे पत्ता:- मु. अंतोर पो. ता. पेण जि. रायगड **जामिनदार** २. श्री अजीत दिनकर ठाकुर पत्ता :-मु. पो. वढाव ता.पेण जि. रायगड ३. श्री जनार्दन रामचंद्र पाटील पत्ता :- मु. पो. रावे ता. पेण जि. रायगड | अर्ज क्र.५६/२२/५३२ ज.क्र. सनिपे/वशी-१/१०१/ सन २०२३ दिनांक १५/०३/२०२३ | राखीव किंमत रक्कम रु. ३,९५,९०,०००/- (अक्षरी तीन कोटी पच्यान्नव लाख नव्वद हजार मात्र) | श्रीमती वैशाली वसंत थळे यांचे नावे असलेली मौजे अंतोरे ता. पेण हद्दीतील जमिन गट क्र. ४१/२ क्षेत्र उ १.०७.० हे आर ही मालमत्ता |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२)लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.१,००,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३)वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५)सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७)ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८)विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
(१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११)पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२)ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
(१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६)सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७)महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
(१८)जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : २५/०९/२०२४

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५-१६

## मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव सोमवार दिनांक २८/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहीर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळुन (७ दिवस) दिनांक २५/१०/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे .**

| अ. क्र. | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसुली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार** १. सौ. मंदाकीनी राजेश पाटील २. श्री राजेश जनार्दन पाटील पत्ता:- मु. रोडे पो.कांदळेपाडा ता. पेण रायगड **जामिनदार** २. श्री प्रकाश धाऊ जाधव पत्ता :- मु.बौध्दनगर पो. ता. पेण . जि.रायगड ३. श्री महेश जनार्दन ठाकुर पत्ता :- मु. ओढांगी पो. वाशी ता.पेण जि.रायगड | अर्ज क्र ५९/२२/५३४ जा.क्र. सनिपे/वशी-१ १०१/सन २०२३ दिनांक १५/०३/२०२३ | राखीव किंमत रक्कम रु. १६,४५,३३२/- (अक्षरी सोळा लाख पंच्येचाळीस हजार तीनशे बत्तीस मात्र) | सौ. मंदाकिनी राजेश पाटील यांचे नावे असलेली मौजे रोडे ग्रामपंचायत ता. पेण हद्दीतील मिळकत क्र.६०/अ, क्षेत्र ६३.२४ चौ.मी. (८९५.९९ चौ. फूट) ही मिळकत |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२)लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३)वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५)सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७)ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८)विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
(१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११)पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२)ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
(१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६)सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७)महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
(१८)जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : २५/०९/२०२४

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

## महाराष्ट्र शासन
### महसुल व वन विभाग
### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग, जि. रायगड

दूरध्वनी क्रमांक ०२१४१/२२२०५४ ई-मेल. tahsilalibag1@gmail.com

क्र.एमएजी कात-१०/वहिवाट दावा क्रं.०६/२०२२ दि. २५/०९/२०२४

**नोटीस**

श्रीम. कुसुम महादेव पाटील (मयत)
१. श्री. भावेश चंद्रकांत पाटील
रा. कुंकवाडी एस. आर. ए. बिल्डींग नं. १०५
पी. एम. रोड विलेपाले (पूर्व) मुंबई ५७
२. श्रीम. मनिषा चंद्रकांत पाटील
घर क्र. २८१, कुरकुंडी कोलटेंभी, पळी रोड, — वादी
पळी अंबेघर जवळ घरी पो. पोयनाड
ता. अलिबाग जि. रायगड व
रा. कुंकवाडी एस.आर.ए. बिल्डींग नं. १०५
पी. एम. रोड विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

विरुध्द

१. श्री. रामचंद्र अंबाजी जाधव मयत तर्फे वारस
१/१. श्रीम. नम्रता रामचंद्र जाधव
१/२. श्री. विक्रम रामचंद्र जाधव
१/३. श्री. ओमप्रकाश रामचंद्र जाधव
१/४ श्रीम. ममता रामचंद्र जाधव
१/५. प्रिया अतुल पवार
रा. आकांक्षा अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०१
महालक्ष्मी मंदिरासमोर दहिवली कर्जत
२. आनंदीबाई आंबाजी जाधव (मयत) — प्रतिवादी
३. श्रीम. वत्सला अंबाजी जाधव
४. श्रीम. मिनाक्षी विजय पाटील
५. श्री. के.डी. पाटील
६. श्री. विनोद परशुराम पाटील
७. श्रीम. प्रिती विनोद पाटील
१/१ ते १/४ तसेच २ ते ७ रा. कुरकुंडी कोलटेंभी
पो. पोयनाड ता.अलिबाग जि. रायगड
८. श्री. सुहास सदानंद पाटील
९. श्री. सुजित सदानंद पाटील
दोघेही रा. मु.धेरंड पो. शहापुर ता.अलिबाग जि. रायगड

| गावाचे नाव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|---|---|
| कुरकुंडी | १४२ | २ | ०-३८.००, | ७.८८ |

अर्जदार व सामनेवाले यांस कळविण्यात येते की, सामनेवाले यांनी अर्जदारांचा वहिवाटीचा रस्ता अडविल्यामुळे अर्जदार यांनी मौजे कुरकुंडी कोलटेंभी या मिळकती संबंधी या कोर्टात दावा दाखल केला आहे. त्याची सुनावणी दिनांक ०४/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता करणेचे ठरले आहे. म्हणुन तुम्ही अगर तुमचे प्रतिनीधी सर्व पुराव्यानीशी तहसिलदार कार्यालय अलिबाग येथे हजर रहावे. वरील प्रमाणे तुम्ही अगर तुमचे प्रतिनीधी मार्फत सर्व साक्षी पुरावे व कागदपत्रासह वरील ठिकाणी हजर न राहील्यास प्रकरणाची सुनावणी तुमचे गैरहजेरीत घेण्यात येवून आपणास काही एक सांगावयाचे नाही असे गृहित धरुन दाव्याचा निर्णय दिला जाईल,

सही/-
**तहसिलदार अलिबाग**

**निवडक**

## यूएसचा शानदार विजय

**नवी दिल्ली :** आयसीसी क्रिकेट वर्ल्ड कप लीग स्पर्धेतील ३३ व्या सामन्यात यूएसने यूएईवर १३६ धावांनी धमाकेदार विजय मिळवला आहे. यूएसने यूएईला विजयासाठी ३४० धावांचं अवघड आव्हान दिलं होतं. मात्र यूएसच्या धारदार बॉलिंगचा सामना यूएईला करता आला नाही. त्यांचा डाव ३७ षटकांच्या आतच आटोपला. यूएसने यूएला २०३ धावांवर गुंडाळलं. यूएईकडून तिघांनी अर्धशतकी खेळी केली. मात्र इतर फलंदाजांनी यूएसच्या गोलंदाजांसमोर सपशेल गुडघे टेकले.

## ऋषभचे रँकिंग वाढले

**मुंबई :** भारतीय फलंदाज ऋषभ पंत आयसीसीच्या कसोटी क्रमवारीत सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. अपघातानंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या पंतने बांगलादेशविरुद्ध दुसऱ्या डावात शतक आणि १०९ धावा केल्या. बुधवारी जाहीर झालेल्या क्रमवारीत यशस्वी जैस्वालला एका स्थानाचा फायदा झाला आहे. यशस्वी ७५१ गुणांसह पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. रोहित शर्माला पाचवे रँकिंग गमवाव लागल आहे. आता भारतीय कर्णधार दहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

## संजू सॅमसनकडे दुर्लक्ष

**मुंबई :** बीसीसीआयच्या देशांतर्गत क्रिकेट हंगामातील दुसऱ्या स्पर्धेला अवघ्या काही दिवसांनी सुरुवात होणार आहे. इराणी ट्रॉफी स्पर्धेचं आयोजन १ ते ५ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आलं आहे. या स्पर्धेतील रेस्ट ऑफ इंडिया आणि मुंबई या दोन्ही संघांची घोषणा करण्यात आली आहे. अजिंक्य रहाणे मुंबईचा कॅप्टन आहे. तर ऋतुराज गायकवाड रेस्ट ऑफ इंडिया टीमची कॅप्टन्सी करणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने पुन्हा एकदा संजू सॅमसनकडे दुर्लक्ष झाल्याचं स्पष्ट झालं आहे.

## द्रोणच्या धावांचा डोंगर

मुंबई : प्रणव धनवडे, पृथ्वी शॉ, अरमान जाफर सारख्या काही फलंदाजांनी स्कूल क्रिकेटमध्ये धावांचा डोंगर रचल्याची उदहारण आहेत. या खेळाडूंनी एकाच इनिंगमध्ये इतक्या धावा केल्या की, त्याने क्रिकेट चाहते अवाक झाले. आता गुजरातच्या १८ वर्षाच्या द्रोण देसाईने स्थानिक टुर्नामेंटमध्ये असाच कारनामा केला आहे. त्याने आपल्या शाळेकडून खेळताना स्वबळावर ४९८ धावा फटकावून इतिहास रचला आहे. अहमदाबादमध्ये अंडर -१९ टुर्नामेंट सुरु आहे. त्यामध्ये द्रोणने ही कामगीरी केली आहे.

## पोलीसांची कारवाई

**मुंबई :** भारत आणि बांगलादेश यांच्यात दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. पहिल्या सामन्यात भारताने मोठा विजय मिळवला. आता दुसरा सामना २७ सप्टेंबरपासून कानपूर येथे खेळवला जाणार आहे. काही संघटनांनी विरोध केला आहे. सामना सुरू होण्यापूर्वी पोलीसांनी मोठी कारवाई केली असून २० जणांविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे. स्टेडियम रोडसमोर हवन करणाऱ्या अखिल भारतीय हिंदू महासभेच्या कार्यकर्त्यांविरोधात हा एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

# ऑस्ट्रेलियाला टक्कर देण्यासाठी सज्ज

## विश्वचषक जिंकण्याचा हरमनप्रीतला विश्वास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

'आयसीसी' जेतेपदाचा दुष्काळ संपवण्यासाठी भारतीय महिला संघ सज्ज झाला असून ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकण्याची आमच्याकडे आता सर्वोत्तम संधी असल्याचे मत कर्णधार हरमनप्रीत कौरने व्यक्त केले. तसेच जेतेपद मिळवायचे झाल्यास बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा अडथळा पार करावा लागू शकेल याची हरमनप्रीतला जाण असली, तरी त्यांचे आव्हान परतवून लावण्याची क्षमता आमच्या संघात असल्याचा विश्वास तिने व्यक्त केला.



संयुक्त अरब अमिराती येथे ३ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या महिलांच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघ मंगळवारी मुंबईहून रवाना झाला. त्यापूर्वी मुंबईतच विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हरमनप्रीतसह महिला संघाचे प्रशिक्षक अमोल मुझुमदार आणि निवड समितीच्या अध्यक्ष नीतू डेव्हिड उपस्थित होत्या. महिलांच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकाला २००९ पासून सुरुवात झाली आणि तेव्हापासून भारतीय संघ केवळ एकदाच अंतिम फेरी गाठू शकला आहे. २०२० च्या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाकडून पराभूत झाल्याने भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. त्यावेळीहरमनप्रीतचभारतीयसंघाची कर्णधार होती. तसेच २०१७च्या एकदिवसीय विश्वचषकात अंतिम फेरीत हार पत्करणाऱ्या भारतीय संघातही हरमनप्रीतचा समावेश होता. आता या कटू आठवणी पुसून टाकण्यासाठी हरमनप्रीत सज्ज झाली आहे.आम्ही आता सर्वोत्तम संघासह विश्वचषकात उतरणार आहोत. या संघातील खेळाडू बऱ्याच काळापासून एकत्रित खेळत आहेत. त्यामुळे आम्हाला एकमेकांची ताकद आणि कच्चे दुवे ठाऊक आहेत. हे आमच्यासाठी फायदेशीर ठरू शकेल. गेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषकात (२०२३ मध्ये) आम्ही उपांत्य फेरी गाठली होती. पण जेतेपदापासून दूरच राहिलो. यंदा आमच्याकडे विश्वविजेते होण्याची सर्वोत्तम संधी आहे. यापूर्वीच्या स्पर्धांच्या तुलनेत यंदा आमची तयारी अधिक चांगली झाली आहे. आम्ही छोट्या-छोट्या गोष्टींवर काम केले आहे. त्या मेहनतीचे फळ आम्हाला मिळेल अशी खात्री वाटते, असे हरमनप्रीतने सांगितले.

जुलैमध्ये श्रीलंका येथे झालेल्या आशिया चषकात भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. त्यानंतर भारतीय महिला संघाने स्पर्धात्मक सामना खेळलेला नाही. ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने महिला संघाचे बंगळूरुच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) सराव शिबीर झाले. यात खेळाडूंची तंदुरुस्ती आणि क्षेत्ररक्षण यावर विशेष मेहनत घेण्यात आली.आशिया चषकात आम्ही चांगले क्रिकेट खेळलो. मात्र, एखाद्या दिवशी काही गोष्टी तुम्हाला हव्या तशा होत नाहीत. तेच आमच्याबाबतीत अंतिम फेरीत घडले. त्यानंतर आम्ही बऱ्याच गोष्टींबाबत चर्चा केली. खेळातील उणिवा दूर करण्याचा आम्ही प्रयत्न केला. आता विश्वचषकात आम्ही सर्वोत्तम खेळ करू आणि जेतेपद पटकावू अशी आशा आहे, असे हरमनप्रीतने नमूद केले.आपली भूमिका चोख बजावण्याची क्षमता असलेल्या भारतीय संघातील फलंदाजांवर माझा पूर्ण विश्वास असल्याचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार म्हणाले. आमच्या अव्वल सहा फलंदाज फार प्रतिभावान आहेत.



## पीएनपीच्या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड व जेएसएम कॉलेज अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुकास्तरीय शालेय हॉलिबॉल स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत पीएनपी होली चाईल्ड स्कूल वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत १४ वर्ष वयोगट मुले प्रथम क्रमांक, १७ वर्ष वयोगट मुले तृतीय क्रमांक, १७ वर्ष वयोगट मुली तृतीय क्रमांक मिळवून त्यांची जिल्हास्तरीय हॉलिबॉल स्पर्धेत निवड झाली आहे.

या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले व उपमुख्याध्यापिका शर्मिला शेट्टे, क्रीडा प्रशिक्षक अक्षय डाकी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## श्रेयसने मुंबईत खरेदी केलं आलिशान घर

### घराची किंमत दोन कोटी ९० लाख रुपये

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेटपटू श्रेयस अय्यर आणि त्याची आई रोहिनी अय्यर यांनी मुंबईतील वरळी भागात एक आलिशान अपार्टमेंट खरेदी केलं आहे. या अपार्टमेंटची किंमत तब्बल २.९० कोटी रुपये असल्याचे सांगितलं जातं आहे. तसेच हे अपार्टमेंट ५२३ चौरस फूट आकाराचे असून ५५ हजार २३८ रुपये प्रति चौरस फूट दराने खरेदी केल्याचीही माहिती आहे.

हिंदुस्तान टाइम्सने झॅप्की या वेबसाईटच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, वरळीच्या आदर्श नगर भागातील त्रिवेणी इंडस्ट्रियल सीएचएसएलच्या दुसऱ्या मजल्यावर हे अपार्टमेंट आहे. १९ सप्टेंबर २०२४ रोजी या अपार्टमेंटची नोंदणी करण्यात आली आहे. यासाठी श्रेयस अय्यरने १७.४० लाख रुपयांची स्टँप ड्यूटी तसेच ३० हजार रुपये नोंदणी शुल्क भरल्याचे सांगण्यात येत आहे.

खरं तर मालमत्ता खरेदीवरून श्रेयस अय्यर पहिल्यांदाच चर्चेत आला, असं नाही. यापूर्वी २०२० मध्ये श्रेयसने मुंबईतील सर्वात उंच इमारतींपैकी एक असलेल्या लोढा वर्ल्ड टॉवर्समध्येही ३८० चौरस फुटांचे अपार्टमेंट खरेदी केले होते. द वर्ल्ड टॉवर्सच्या ४८व्या मजल्यावर हे घर खरेदी करण्यात आलं होतं. दरम्यान, श्रेयस अय्यर सध्या भारतीय संघाबाहेर आहे. मागील काही कालावधीपासून तो संघात स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करतो आहे. त्याला बांगलादेशविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघात स्थान मिळालेले नाही.

काही दिवसांपूर्वी तो दुलीप ट्रॉफीमध्येखेळतानादिसलाहोता.या स्पर्धेत त्याने चांगली कामगिरी केली होती. या कामगिरीच्या जोरावर श्रेयस लवकरच भारतीय संघात पुनरागमन करेन, असा विश्वास त्याच्या चाहत्यांना आहे.

## मला दोनच हात...विराट चाहत्यावर संतापला

**कानपूर :** भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटीसामन्याला २७तारखेपासून सुरुवात होत आहे. यासाठी टीम इंडिया कानपूर येथे दाखल झाली आहे. येथील ग्रीन पार्क स्टेडियमवर मोठ्या कालावधीनंतर कसोटी सामना पार पडत आहे. भारतीय संघ इथे दाखल होताच त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत झाले. यावेळी विराट कोहली एका चाहत्यावर संतापला. विराटच्या हातात टॅब, फोन होता. स्वागतावेळी त्याला पुष्पगुच्छ देण्यात आला तेव्हाच एका व्यक्तीने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला. पण, विराटने एकही हात मोकळा नसल्याचे सांगितले.

## वसीम अक्रमने केली ऋषभ पंतची स्तुती

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**





ऋषभ पंतने बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीत शानदार पुनरागमन करत शतक झळकावले. त्याने कार अपघातानंतर भारतीय कसोटी संघात जवळपास ६०० दिवसांनंतर पुनरागमन केले. आता त्याच्या शतकी खेळीने सर्वांची मनं जिंकली आहेत. माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू वसीम अक्रमने ऋषभ पंतच्या पुनरागमनंतर केलेल्या खेळीचे कौतुक केले आहे. ऋषभ पंतने अपघातानंतर पुनरागमन करताना पहिल्यांदाआयपीएल२०२३ मध्ये छाप पाडली. ज्यामुळे त्याला टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघात स्थान मिळाले. यानंतर पंतने अलीकडेच बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात ६३२ दिवसांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन केले. पंतने बांगलादेशविरुद्ध दमदार कामगिरी करत शतक झळकावले. त्याने १२८ चेंडूचा सामना करताना १०९ धावांची खेळी साकारली. ज्यामध्ये १३ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. कार अपघातात ऋषभ पंत जखमी झाल्यानंतर पाकिस्तानातील लोक त्यांच्या प्रकृतीबाबत चिंतेत होते, असे वसीम अक्रम यांनी सांगितले. आता पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज पंतच्या दमदार पुनरागमनाने खूप प्रभावित झाला आहे. तो म्हणाला, ऋषभ पंतची कामगिरी बघा, त्या अपघातानंतर त्याने ज्या पद्धतीने पुनरागमन केले आणि ज्याप्रकारे कामगिरी केली ती सुपरह्यूमन सारखी आहे. तो ज्याप्रकारे अपघातात जखमी झाला होता, त्याबद्दल आम्हा सर्व पाकिस्तानी लोकांना खूप चिंता वाटली होती. मी खूप चिंतेत होतो आणि अनेक वेळा ट्विटही केले होते, असे वसीन अक्रम म्हणाला.

## स्मिथचा अप्रतिम झेल टिपला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाचा स्टार बॅटर स्टीव्हन स्मिथ याने इंग्लंड विरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात संयमी अर्धशतकी खेळी केली. इंग्लंडमधील ड्युरॅम काउंटी येथील चेस्टर-ल-स्ट्रीटच्या मैदानात रंगलेल्या सामन्यात स्टीव्ह स्मिथनं ५ चौकाराच्या मदतीने ८२ चेंडूचा सामना करताना संघाच्या खात्यात ६० धावांची भर घातली. जोफ्रा आर्चरच्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या नादात तो झेलबाद झाला.

परफेक्ट शॉट सिलेक्शनसह क्षेत्ररक्षक नसलेल्या जागेत हा अप्रतिम फटका खेळला होता. पण इंग्लंडच्या ताफ्यातील ब्रायडन कार्स याने चपळाईचा नजराणा पेश करत त्याचा अप्रतिम झेल टिपला. त्यामुळे स्मिथच्या खेळीला ब्रेक लागला. सीमारेषवर इंग्लंडच्या क्षेत्ररक्षकाने दाखवलेल्या चपळाईमुळे रंगात आलेल्या स्मिथचा बेरंग झाला अन् त्याचा चेहरा पडला. तो अगदी निराश होऊन तंबूत परतला. ऑस्ट्रेलियाच्या डावातील ३५ व्या षटकात स्मिथ आणि विकेट किपर बॅटर ॲलेक्स कॅरी ही जोडी अगदी सेट झाली होती. जोडी फोडण्यासाठी इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकनं चेंडू जोफ्रा आर्चरच्या हाती सोपवला. इंग्लंडच्या कॅप्टनची रणनिती यशश्वी ठरवण्यासाठी जोफ्रानं आखूड टप्प्याचा चेंडू टाकत स्मिथला पूल शॉट खेळायला भाग पाडलं आणि तो बाद झाला.

## इराणी चषकासाठी दोन मराठमोळे कर्णधार भिडणार

### सामन्याला १ ऑक्टोबरपासून होणार सुरुवात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**





बीसीसीआयने इराणी चषक २०२४ साठी सध्याच्या रणजी ट्रॉफी चॅम्पियन मुंबई आणि रेस्ट ऑफ इंडियाच्या संघांची घोषणा केली आहे. या संघांमध्ये काही खेळाडू असे आहेत ज्यांची बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी निवड करण्यात आली होती. आता त्यांना टीम इंडियाच्या संघातून न वगळता रेस्ट ऑफ इंडिया संघात समाविष्ट केले आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेत दोन मराठमोळे कर्णधार आमनेसामने येणार आहेत. रेस्ट ऑफ इंडियाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड तर अजिंक्य रहाणे मुंबईचे नेतृत्त्व करणार आहे.

हा सामना १ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. अलीकडेच सर्फराझ खानबद्दल अशी अटकळ बांधली जात होती की, त्याला टीम इंडियाच्या संघातून वगळून मुंबई संघात पाठवले जाऊ शकते. हे दावे पूर्णपणे खरे असल्याचे सिद्ध झाले आहे. सर्फराझ शिवाय त्याचा भाऊ मुशीर खानही मुंबई संघात खेळणार आहे. ध्रुव जुरेल आणि यश दयाल यांना बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात खेळण्याची संधी मिळणार नाही. कारण ते दोघेही रेस्ट ऑफ इंडिया संघाकडून खेळणार आहेत. इराणी चषक १९६० मध्ये सुरू झाला आणि तेव्हापासून ही स्पर्धा भारतीय क्रिकेटचा अविभाज्य भाग बनली आहे. इराणी चषकमध्ये फक्त एकच सामना खेळला जातो, ज्यामध्ये गतविजेत्या रणजी चॅम्पियन्सचा सामना रेस्ट ऑफ इंडियाशी होतो. रेस्ट ऑफ इंडिया संघात गतविजेत्या रणजी चॅम्पियन्स संघातील खेळाडू वगळता इतर राज्यातील खेळाडू एकत्र येऊन खेळतात. मुंबई हा सध्याचा रणजी चॅम्पियन असल्याने त्याचा सामना रेस्ट ऑफ इंडियाशी होणार आहे.

## काँग्रेसचा हात म्हणजे थप्पड

**■ विनेश फोगाट कडाडली**

**हरियाणा :** भारताची माजी स्टार महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत उतरली आहे. काँग्रेसच्या तिकीटावर ती जुलाना या मतदारसंघातून नशीब आजमावत आहे. विनेशने विरोधकांना फटकारताना आणि त्यांना इशारा देताना एक मोठे विधान केले. काँग्रेसच्या पंजाचे निशाण कानाखाली मारण्याचे काम करेल. हे हाताचे निशाण आहे, हा हात थप्पड मारण्याचे काम करेल. याशिवाय थप्पडचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचेल, असेही विनेश फोगाटने म्हणाली. भाजप आणि आम आदमी पक्षाने देखील इथे तगडा उमेदवार दिला आहे. विनेश प्रचारात व्यग्र आहे. प्रचारादरम्यान विनेशने एक मोठा दावा करताना खेळाडूंसाठी खेळाडूच पॉलिसी तयार करतील, असे तिने सांगितले होते. अलीकडेच एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत विनेशने राजकारणात येण्यामागील कारण सांगितले होते.

URGENT REQUIREMENT

BHARTIYA EDUCATION SOCIAL CHARITABLE TRUST
SMT. SHANTIBAI OTARMAL JAIN AYURVEDIC MEDICAL COLLEGE & RUGANALAY

| Sr. No. | Name of Position | No. of post | Qualification & requirements |
|---|---|---|---|
| 1 | HR Manager | 01 | MASTER'S DEGREE IN HUMAN RESOURCES, BUSINESS ADMINISTRATION, MIN 5 YEARS OF EXPERIENCE |
| 2 | Administrastion Officer | 01 | PREFERRED EXPERIENCE IN ADMINISTRATION FOR 5 YEARS.PREFERENCE WILL BE GIVEN TO EX - DEFENCE SERVICEMEN |
| 3 | Senior Accountant | 01 | M.COM, TALLY, (BOOK- KEEPING, PREPARE BALANCE SHEET, TAXATION, GST, TDS) |
| 4 | Clerk | 02 | B.A., PROFICIENT IN MARATHI AND ENGLISH TYPING (30 WPM). MINIMUM 5 YEARS EXPERIENCE, PREFERABLY IN EDUCATIONAL OR INSTITUTIONAL ROLES. |

NOTE :- Attractive Salary Package For Deserving Candidate
For Registration Scan The QR Code or Send Resumes
Send Your Resume here ssojamc@gmail.com
8826011877
8387078707
Bhartiya Education Vidya Sankul, At- Velshet (Nagothane),Tal- Roha,Dist-Raigad.

### राज्यस्तरीय स्पर्धेवर अलिबाग-पनवेलचा दबदबा

# रायगडच्या कराटेपटूंनी महाराष्ट्राची ट्रॉफी जिंकली

**। रायगड । प्रतिनिधी ।**



नुकत्याच झालेल्या जळगाव येथे ट्रेडिशनल रेसलिंग या राज्यस्तरीय स्पर्धा पार पडल्या. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील अलिबाग आणि पनवेल तालुक्यातील मुलांनी सुवर्ण कामगिरी केली. जेएसएम कॉलेजची वेदिका संतोष कवळे (नवगाव) हिने बेल्ट रेसलिंग स्पर्धेत सुवर्णपदक आणि मास रेसलिंगमध्ये सुवर्णपदक पटकावले आहे. पीएनपी वेश्वी कॉलेजची सुरभी अजित पाटील (मल्याण) हिने बेल्ट रेसलिंग, मास रेसलिंग स्पर्धेत सुवर्णपदक आणि पेनक्रिएशनमध्येसुवर्णपदकपटकावले. तीन सुवर्णपदक मिळवणारी ती स्पर्धेची पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. म्हणून तिचा विशेष मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. महाजने गावाची श्रमीका श्रीधर पाटील हिने एक सुवर्णपदक आणि एक रजतपदक पटकावले. लायाबा सेहेजाद अन्सारी-रामराज ही दोन सुवर्णपदकांची मानकरी ठरली. विरेन पाटील-रेवस सुवर्णपदक, अंश आल्हाद नाईक-कुणे सुवर्णपदक, अनुष्का परमेश्वर पोले-सार्तिजे हिने दोन सुवर्णपदकं जिंकली. श्रवण संदीप भोईर-दिघोडी दोन सुवर्णपदक, जिग्नेश गजानन कोळी-अलिबाग कोळीवाडा सुवर्णपदक आणि रजतपदक, राहुल ओंमबादुर गुरुम-सोगाव एक रजत आणि एक सुवर्णपदक, छवी सागर अग्रवाल, पेझारी मास रेसलिंग सुवर्णपदक, पनवेल कराटे क्लासमधून स्पंदन योगेश अंकुश-पनवेल याने सुवर्णपदक पदक पटकावले. विघ्नेश संतोष पानसरे-तळोजा सुवर्णपदक, सोहम पाटील पनवेल सुवर्णपदक, योगेश्वर अमर राहटे-पनवेल सुवर्णपदक मिळाले. या सर्व विद्यार्थ्यांनी सुंदर खेळाचे प्रदर्शन केले. रायगडच्या मुलांनी महाराष्ट्रात सर्वात जास्त सुवर्ण पदके मिळवली. म्हणून प्रथम क्रमांकाची ट्रॉफी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सी. ए. तांबोळी आणि सचिन वाघ यांच्यासह अन्य मान्यवर यांच्या हस्ते देण्यात आली. मुलांबरोबर राष्ट्रीय पंच रसिका मडवी पनवेल तसेच संघटनेचे जिल्हाध्यक्ष संतोष कवळे यांचा उत्कृष्ट पंच म्हणून ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.

विजयी स्पर्धकांची ३ ते ६ ऑक्टोबर २०२४ रोजी उत्तराखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ते महाराष्ट्राचे नेतृत्व करणार आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)